श्री साइनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

अंक ११-१२, वर्ष ८ ] पौष-माघ [ शके १८५३

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्वप्नसृष्टि ... ... ... ... ... | १—६ |
| पत्रव्यवहार ... ... ... ... ... | ७-१४ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | १५-२२ |
| कै० काकासाहेब दीक्षित यांच्या मृत्युपत्राचा उतारा ... | २४-२६ |
| स्फुट विषय ( सूत्रें ६१ ते ७६ ) ... ... ... | १२१-१३८ |
| गुरुप्रसाद अथवा विश्वामित्राचें अस्त्रदान ... ... | १—८ |
| अर्वाचीन भक्तलीलामृत ... ... ... ... | ३३-३५ |
| श्री संतकथामृत ( अध्याय ५७ वा )... ... ... | ३६-४४ |


# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

# स्वप्नसृष्टि

मंगळवार ता. ५ जानेवारी १९३२ रोजीं रात्रीं सुमारें साडेनऊ वाजतां लेखकाला रावसाहेब रामराव गणपतराव कमळाकर हे ( उमर सुमारें ६९ वर्षे ) मालाड मुक्कामीं एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून निवर्तल्याची बातमी मिळाली. प्रेतयात्रा दुसऱ्या दिवशीं काढावयाची असें कै. रामरावांचे वडील बंधु श्रीयुत शामराव, जे लेखकाच्या घरानजिकच राहात आहेत, यांनीं ठरविल्या-मुळें दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवार ता. ७ रोजीं सकाळीं मालाड येथें लेखक गेला होता. प्रेतयात्रा सकाळीं आठ वाजतां निघून दहनक्रियेसाठीं कै. राम-रावांचें शव नेण्यांत आलें. ज्या रस्त्यानें जाणें घडलें तो रस्ता पाहातांच लेख-काला अत्यंत विस्मय वाटला.

मालाड गांवांत सन १८९५ सालीं लेखक पहिल्यानें गेला होता. त्या वेळीं गांवठाणाच्या एका उंचवटयाच्या जागेची विक्री व्हावयाची होती. ती जागा विस्तीर्ण असून अगदीं स्वल्प किंमतींत म्हणजे सुमारें २००० रुपयांस ( दोन हजार रुपयांस ) खरेदी करण्यासाठीं लेखकाचा एक मित्र त्याला एक-सारखा आग्रह करीत होता; पण त्या वेळीं त्या जागेसाठीं इतका पैसा केवळ जमिनींत घालणें इष्ट नाहीं असें वाटून लेखकानें त्याकडे दुर्लक्ष केलें. त्यानंतर १८९७ सालीं मुंबईंत एकएकीं प्लेगचा भयंकर प्रादुर्भाव होऊन त्या जागेची किंमत पन्नास हजार रुपये झाली आणि आजमितीस ती जागा दोन–अडीच लाख रुपयांच्या किमतीची आहे.

असो, त्या दिवशीं म्हणजे सन १८९५ सालीं मालाडच्या स्टेशनवर उतरून ती जागा पाहण्यास लेखक गेला होता, तीच त्याची, त्या जागेची व त्या रस्त्याची प्रथमची मुलाखत. त्यानंतर त्या रस्त्यानें लेखक मालाडला कधींही गेला नाहीं.

नाहींपेक्षां १९१० सालीं श्री दासगणूंचें मालाडला एका गृहस्थाच्या घरीं कीर्तन झालें होतें, त्या वेळीं लेखक कीर्तनाला गेला होता; परंतु कीर्तनाची

जागा मालाड गांवाच्या अलीकडच्या भागांत असल्यामुळें वरील वर्णन केलेल्या रस्त्यांतून त्याचें जाणें झालें नाहीं.

कै. रामराव हे मालाड येथें एका मित्राच्या घरीं राहात होते, हें ठाऊक होतें. त्यांच्या खबरीला सुमारें दोन वर्षांपूर्वी लेखक गेला होता. घर घोडबंदरच्या रस्त्यावर गांवाच्या अलीकडे म्हणजे दक्षिण बाजूला आहे. त्या वेळेस देखील वर वर्णन केलेला रस्ता पलीकडे म्हणजे उत्तरच्या बाजूस असल्यामुळें त्या रस्त्यानें जाणें झालें नाहीं इतकेंच नाहीं, परंतु त्या रस्त्याच्या अस्तित्वाविषयींचीही त्याला पूर्ण विस्मृति होती.

अशी वस्तुस्थिति आहे. गेल्या डिसेंबर महिन्याच्या तिसाव्या तारखेला पहांटेस लेखकाला स्वप्न पडलें कीं, तो मालाडच्या स्टेशनावर उतरून ज्या रस्त्यानें १८९५ सालीं गेला होता त्याच रस्त्यानें चालला होता. बरोबर कोणी मंडळी नव्हती; एकटाच होता. सध्यां स्मशान आहे त्याच्या दरवाज्यापाशीं एक महादेवाचें देऊळ आहे. तें पूर्वी अत्यंत लहान रस्त्याच्या बाजूला, खेडेगांवीं असावें, अशा प्रकारचें होतें. स्मशानाच्या जागेभोंवतीं त्या वेळीं भिंती नव्हत्या; स्वप्नांत त्याला सध्यांचें देऊळ व स्मशानाच्या भिंती स्पष्ट दिसल्या. रस्ता तर पूर्ण ओळखीचा आणि हें देऊळ व या स्मशानाच्या भिंती कशा त्या पाहून त्याला त्या स्वप्नांत विस्मय वाटून तो जागा झाला.

कै. रामरावांच्या स्मशानयात्रेच्या वेळीं तो पांचसहा दिवसांपूर्वी स्वप्नसृष्टींतील देखावा पाहून त्याला विस्मय वाटला.

प्रश्न आतां उद्भवतो कीं, लेखकाला पांचसहा दिवसांपूर्वी हें स्वप्न पडावें, त्या रस्त्यानें जाणें होईल याची भावी सूचना व्हावी, हें सर्व कसें ?

अशा प्रकारच्या स्वप्नसृष्टींत घडणाऱ्या गोष्टींचें विवेचन झाल्यास श्रींच्या पायापाशीं बसून घडलेल्या **कांहीं** चमत्कारांविषयीं उलगडा होण्याला कारणीभूत होतील.

याच हेतूनें हा लेख लिहिण्यांत येत आहे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला अशा प्रकारचीं सूचनापूर्वक स्वप्नें पडतातच; परंतु त्यांचा व्हावा तसा उल्लेख होत नाहीं आणि त्याविषयीं विचार करण्यांत येत नाहीं.

पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या तत्त्वज्ञानांत स्वप्नसृष्टीविषयीं विचारपूर्वक अध्यात्मिक विवेचन दिसून येत नाहीं. तसेंच निद्रास्थितिविषयकही गहन विचार केलेला दिसत नाहीं.

जो कांहीं विचार त्यांच्या ग्रंथांत दिसून येतो तो जागृत स्थितींतल्या अनुभवांचा आहे. स्वप्न व निद्रास्थितिविषयीं अध्यात्मिक बाजूंनीं जो विचार आपल्या तत्त्वज्ञान्यांनीं व आत्मसाक्षात्कारी संतांनीं पूर्ण अनुभवाअंतीं केला आहे, आणि या सर्व स्थितींची जुळवाजुळव करून अध्यात्माची मजल तुर्या व समाधिस्थितिप्रत त्यानीं नेली आहे, तशी विचारसरणी पाश्चात्यांच्या विवेचनांत मुळींच दिसून येत नाहीं.

या कारणांनीं अशा प्रकारचें स्वप्नसृष्टींतले घडलेले अनुभव श्रींच्या व इतर भक्तांनीं लिहून पाठविल्यास श्रीसाईलीलेंत ते जरूर प्रसिद्ध होऊन आधुनिक विद्वानांना वर लिहिल्याप्रमाणें आमच्या आत्मसाक्षात्कारी संतांच्या लेखांबद्दल व त्यांच्या चमत्कृतियुक्त लीलांबद्दल विचार करण्यास अनेक रीतीनें साधनीभूत होतील असें वाटतें, आणि श्री सांईबाबांच्या पायांपाशीं जे चमत्कारिक अनुभव दृष्टोत्पत्तीस आले त्यांतल्या **कांहींचा** अध्यात्मदृष्ट्या व पाश्चात्य विद्याप्रवीणांना पटेल असें विवेचन होणें शक्य आहे, असें लेखकाला वाटतें.

येथें पुनः पुन्हां अगदीं स्पष्ट रीतीनें कळविण्यास आनंद वाटतो कीं, श्री साईमाऊलीच्या पायांपाशीं व त्यानंतर अनेक अत्यंत आश्चर्यकारक असे अनुभव घडलेले आहेत व आजतागायत घडत आहेत. श्री साईलीलेचें अस्तित्व याचसाठीं आहे कीं, अशा प्रकारचे खात्रीपूर्वक अनुभव प्रसिद्ध होऊन, या केवळ भाकडकथा नाहींत. हे सर्व प्रकार काय आहेत व कसे घडतात या विषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊन, आत्मसाक्षात्कारी पुरुषांच्या साम-

ष्यांची मजल कोठपर्यंत जाऊं शकते यांविषयींच्या विचारांना चालना उत्पन्न व्हावी. श्री साईबाबा हे कांहीं चमत्कारांचें दुकान घालून बसले नव्हते. चमत्कार दाखवून, थोतांड उत्पन्न करून, आपल्या जाळ्यांत गोंवून, आपल्या भक्तांकरवीं ऐहिकधनदौलत त्यांनीं गोळा केली नाहीं, इतकेंच नाहीं, पण "मी बाबाला दक्षिणा देतों" असा क्षुद्र विचार मनांत येणाऱ्या अनेक इसमांना-मग ते लक्षाधीश कां असेनात-अशांना ज्याच्या-त्याच्याजवळ पांच-पंधरा रुपयांची द्रव्ययाचना करावयाला लावून त्यांना जेरीस आणीत, हें सूक्ष्म दृष्टीनें पहाणारांस तेव्हांच कळत असे. तर मग हे चमत्कार कसे घडत व त्यांचा सहज समजेल असा उलगडा होऊं शकेल काय, याचा विचार व्हावा याच हेतूनें वरील स्वप्नसृष्टीच्या अनुभवाचा दाखला देऊन अशाच प्रकारचे खात्रीपूर्वक अनुभव प्रसिद्ध व्हावेत, ही नम्र विनंति करण्यांत येत आहे.

स्वप्नें अनेक प्रकारचीं पडतात. त्यांतलीं मुख्यत्वेंकरून अपचनामुळेंच असतात; परंतु कधीं कधीं अशीं आश्चर्यकारक स्वप्नें पडतात कीं, त्यामुळें मति गुंग होते. हें कां घडतें ? आपणा प्रत्येकामध्यें हें काय प्रचंड सामर्थ्य आहे कीं, ज्याची स्वल्पशी झुळुक अशा प्रकारच्या स्वप्नद्वारें कळावी व या गोष्टींचा योग्य खल झाल्यास श्री साईबाबांच्या पायांपाशीं, व त्यानंतर, जे अनेक आश्चर्यकारक अनुभव दृष्टोत्पत्तीस आले आहेत आणि जे भाकडकथा अथवा (mere imaginations) केवळ स्वकल्पोकल्पित असे प्रकार नव्हत, अशा तऱ्हेची खातरी पाश्चत्य शास्त्रज्ञ प्रवीणांना होऊन त्यांतील कांहींचा उलगडा होण्याचा बराच संभव आहे, असें या अज्ञानी लेखकाला वाटतें.

याविषयीं अनुभवजन्य असे लेख आल्यास सर्व जिज्ञासु भक्तमंडळावर अत्यंत उपकार होतील.

वांद्रें,
ता. ११ जानेवारी १९३२

**रा. आ. तर्खड,**
संपादक.

**ता. क.** अशा प्रकारचे स्वप्नसृष्टींत पडलेले अनुभव पुण्याचे रा. रा. सहस्रबुद्धे यांनीं कळविलेलेले श्री साईलीलेंत प्रसिद्ध झाले आहेत, ते पहावे.

—**संपादक.**

**ता. क.**—वरील लेख लिहिल्यानंतर लेखकाच्या सुदैवानें श्री. चिंतामण विनायक वैद्य यांचा " हिंदुधर्माचीं तत्वें " हा अप्रतिम ग्रंथ हातांत आला. ग्रंथ अति उत्तम व प्रासादिक वाणीनें ओतप्रोत भरलेला आहे आणि तो सर्व आबालवृद्धांनीं व खास करून आधुनिक शास्त्रप्रवीण विद्वान व विदुषींनीं जरूर एकदा तरी अवलोकनांत घ्यावा, अशी लेखकाची त्यांना नम्र प्रार्थना आहे.

या ग्रंथांतील पान १५।१६ चा उतारा खालीं देत आहें. त्याविषयीं ग्रंथकर्ते लेखकाला क्षमा करतील, अशी आशा करितों.

" अशा प्रकारचें प्रत्यक्ष ईश्वराचें दर्शन होणारे साधुपुरुष लाखांत " एखादे आणि शेंकडों वर्षांतसुद्धां पाहावयास न मिळणारे हें खरें; कारण " इतकी निस्सीम भक्ति आणि असा सतत निदिध्यास फारच विरळा. पण " प्रत्येक मनुष्यास जागृतावस्थेंत नाहीं, पण स्वप्नांत आपल्या आत्म्याचें कांहीं " तरी ईश्वराशीं संबंध असलेलें ज्ञान अनुभवास येतें ही गोष्ट निर्विवाद आहे. " स्वप्नाचा विचार करणाऱ्यांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, जें स्वप्न पहां- " टेच्या सुमारास प्रत्यक्ष आपल्यास विलक्षण रीतीचें, मनांत नसलेलें ( ध्यानीं " असे तें स्वप्नीं दिसे ) दिसतें तें व्यवहारांत लागलीच सिद्ध होतें. अशा " प्रकारचें स्वप्न पुष्कळांस सांगतां येईल.असें स्वप्न बहुधा ज्या वेळेस मन शांत, " ईश्वरविषयक विचारानें भरलेलें, अथवा पुण्य ग्रंथाच्या वाचनानें " निर्विकल्प होऊन मनुष्य झोंपीं जातो तेव्हां पडतें. याचा अनुभव मला " अनेक वेळां आला आहे. जास्त न सांगतां माझ्या अनुभवाचें मी एक " स्वप्न सांगतों. सितारामपंत दामले हे ज्या पहांटेस वारले त्या पहांटेस आणि " त्याच वेळेस मला असें स्वप्न पडलें कीं, ' एक प्रेतयात्रा चालली आहे, " तेव्हां त्याच्याबरोबरच्या लोकांपैकीं एकानें मला सांगितलें कीं, ते गृहस्थ

" नुकतेच गेले.' याच वेळेस वासुदेवराव जोशी, चित्रशाळेचे मालक, यांनीं
" मला बाहेरून हांक मारून म्हटलें, 'अहो उठा ! सितारामपंत गेले !' हें
" ऐकून मला खरोखरच आश्चर्य वाटलें. अशा प्रकारचीं स्वप्नें मला दोन
" तीन सांगतां येतील, आणि कित्येक गृहस्थांस अशा प्रकारचा अनुभव
" आलेला असेल. स्वप्नांत जीवात्म्याला होणारी गोष्ट कशी कळते, हें एक
" मोठें गूढ आहे. तें कधीं कधीं कळतें यांत तर संशयच नाहीं. याचा
" निर्णय ईश्वराचें अस्तित्व मानल्याशिवाय लागावयाचा नाहीं. माझ्या दृष्टीनें
" हें एक प्रत्यक्ष प्रमाण आहे, आणि एक क्षणभर कां होईना, या स्वप्नानु-
" भवांत ईश्वराची आपल्यास साक्ष पटणारी आहे. अर्थात या प्रमाणाला
" 'अग्निरुष्णाः' अशा स्वरूपाचा अनुभव हा प्रत्यक्ष पुरावा मानतां येतो. "

# पत्रव्यवहार

## ॐ नमः शिवाय

पार्ये, पो. वसई.

कृ. सा. न. वि. वि. कांहीं महिन्यांपूर्वी मी आपणांस एक पत्र पाठविलें होतें, त्याचें उत्तर मिळालें नाहीं; म्हणून मुद्दाम हें पत्र लिहीत आहें. तरी कृपा करून या पत्राचें उत्तर पाठवावें.

१. श्री साईबाबांनीं समाधीपूर्वी " मी आतां बच्चा होऊन येतों " असें सांगितलें होतें. तरी ते बच्चा होऊन आल्याचें आपणांस माहीत आहे काय ? " साईबाबा " या देहांत त्यांना भेटण्याचें भाग्य माझ्या नशीबीं नव्हतें, परंतु त्या पवित्र व अधिकारी आत्म्याची भेट मला नवीन देहांत तरी होईल काय ? अथवा त्यांच्याइतकाच अधिकारी सत्पुरुष विद्यमान असलेला आपणांस माहीत आहे काय ?

२. केडगांवच्या नारायणमहाराजांबद्दल आपणांस काय माहिती आहे ? दिपवाळींत मी त्यांचेकडे गेलों होतों. त्यांचा मार्ग व साईबाबांचा मार्ग यांत बरेंच अंतर दिसलें.

श्री. शंकरराव गवाणकर यांनीं श्री साईबाबांबद्दलचे अनुभव मला सांगितले, ते फारच महत्त्वाचे आहेत. म्हणून आपणांकडे प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें. ( हे अनुभव दुसरीकडे प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. )

आपला,

**वासुदेव लक्ष्मण गवाणकर.**

उत्तर:—

१ श्री साईबाबा " बच्चा होऊन येणार " ही गोष्ट कर्णोपकर्णी लोकांच्या ऐकिवांत आहे. याविषयीं खात्रीपूर्वक अनुभव कोणी साईभक्तांनीं पाठविल्यास तो आनंदानें प्रसिद्ध करण्यांत येईल.

श्री साईमाऊलीनें लेखकाचें पोट यथासांग भरल्यामुळें, इतर साधुपुरुषांकडे धांव घेण्याचें लेखकाला प्रयोजन वाटलें नाहीं. अशा अद्वितीय

रत्नाच्या चरणधुळीचें वंदन झाल्यामुळें त्यांचीच प्रतिमा लेखकाच्या मनः-चक्षूंपुढें आहे. म्हणून जरी त्यांनीं इतर देह धारण केला असेल—आणि तसें करणें त्यांना मुळींच अशक्य नाहीं. तरी तो कोणता देह आहे, हें धुंडण्याची त्याला आवश्यकता वाटत नाहीं. त्या नवीन देहधारिणाला योग्य वाटल्यास आपली साक्ष ते जरूर प्रटवून देतील याविषयीं लेखकाला संशय नाहीं.

तसेंच "मी तेथें तुझ्यापाशीं नाहीं काय ?" हें वाक्य लेखकासोबत इतरांना श्री. साईमाउली बोलून गेली आहे; तेव्हां त्यांना बाहेर न पाहतां आपल्यापाशींच शोधून काढलें पाहिजे. सर्व संतांचीं वाक्यें याचप्रमाणें शिकवीत नाहींत काय ? गोष्ट वाटते तितकी कठीण नाहीं, तशीच सोपी पण नाहीं. केवळ प्रेमाचीच गोष्ट आहे. बाबांच्या "निष्ठा आणि सबूरी" या शब्दांवर भार ठेविला पाहिजे.

अशा प्रकारची निष्ठा असल्यावर तशा प्रेमयुक्त व्यक्तीला दर्शन देण्याची फरज बाबांना इष्ट रूपानें देतां येते इतकें मात्र आश्वासन देण्याचें धाडस लेखक करीत आहे.

१. केडगांवच्या श्री. नारायणमहाराजांचें दर्शन लेखकाला इ. स. १९११ सालीं त्यांच्या फ्रेंच पुलाजवळच्या श्री. काका महाजनींच्या सोबत श्री. अंजनीबाईच्या घरीं झालें होतें, आणि त्यानंतर आगगाडींत दोनतीन वेळां झालें होतें.

महाराज अधिकारी पुरुष आहेत असें लेखकाला वाटतें. लेखक बुध्यां केडगांवास कधींही गेला नाहीं. त्यांच्या व साईबाबांच्या मार्गामध्यें काय फरक आहे हें त्याला माहीत नाहीं, आणि त्याविषयींची चिकित्सा करण्याचें त्याला कधींही प्रयोजन पडलें नाहीं.

श्री. गवाणकरांच्या पहिल्या पत्राचें उत्तर पाठविण्यास लेखकाकडून विलंब झाला त्याबद्दल त्याला वाईट वाटत आहे. मुख्य कारण हेंच कीं, आपण एक अज्ञानी अननुभवी व अनधिकारी असल्याची त्याला पूर्ण जाणीव आहे. तेव्हां अशा गहन विषयाचें उत्तर कसें द्यावें, हें त्याला कळेना.

हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. श्री साईबाबांच्या देहाचें दर्शन न झालेले शेंकडों बालगोपाल आज हयात आहेत. त्यांच्या मनांत वरील प्रकारच्या प्रश्नमालिका रात्रंदिवस घोळत असल्याच पाहिजेत. श्री. गवाणकरांनीं हे प्रश्न विचारून लेखकावर अत्यंत उपकार केले आहेत.

श्री साईबाबांचें प्रत्यक्ष दर्शन होईपर्यंत त्याच्या १६ व्या वर्षापासून ४५ साव्या वर्षापर्यंत (ज्या वर्षी श्रींचे पाय प्रथम दिसले) लेखकाच्या मनाची जी स्थिति होती त्याची त्याला पूर्ण जाणीव आहे, म्हणून यथाशक्ति यथामति उत्तर देण्याचें तो धाडस करीत आहे; तरी सूज्ञ वाचकांनीं त्याच्या अज्ञानाची कींव घेऊन त्याला क्षमा करावी.

वांद्रे-८-१-१९३२ रा. आ. तर्खड

## श्री साईबाबांच्या हातची उदी

श्रीयुत विठ्ठल लक्ष्मण सुबंध यांच्याकडून ता. २६-१२-३१ चें कृपायुक्त पोस्टकार्ड आलें त्यांतील उतारा:—" आपण अत्यंत कृपावंत होऊन सद्गुरु श्री साईबाबा महाराजांच्या हातची उदी मला पाठविली त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी व ऋणी आहें. उदीसारखी देणगी ( व तीही " बाबांच्या " हातच्या उदीची ) ही सर्व देणग्यांत पूज्य व श्रेष्ठ असून ती अतुलनीय आहे. तिची सर दुसऱ्या कोणत्याही देणगीस येणार नाहीं. याप्रमाणें प्रेमभावानें व भक्तिपूर्वक अंत:करणानें श्री. सुबंध यांनीं जे उद्गार दर्शविलेले आहेत त्यामुळें ज्या "हातच्या उदी" विषयीं अद्यापपर्यंत लेखकानें लिहावयाचें लांबणीवर टाकलें होतें त्या " हातच्या उदी " विषयींचा खुलासा:—

सन १९१० सालच्या सप्टेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेला लेखकाला श्री साईमाऊलीचें प्रथम दर्शन झालें. त्या वेळीं सोबत मित्रमंडळी पुष्कळ होती.

श्री साईमाऊलीनें प्रथम भेटीलाच जी अवर्णनीय खूण दिली आणि ज्याविषयींचा खुलासा झाला आहे त्यावरून श्रींच्या ठायीं त्याची निष्ठा जडली.

श्रींच्या दर्शनास देऊळरूपि मशिदींत दिवसांतून तीनचार वेळां खेपा होत असतच. त्या त्या वेळीं कधीं अल्प वेळांत कधीं बऱ्याच वेळानें

"जा ! उदी घ्या आणि वाडयांत जाऊन बसा !" याप्रमाणें आज्ञा व्हावयाचीच. कधीं कधीं स्वत: उठून धुणीमाईतून आपल्या स्वत:च्या हातानें उदी घेऊन ती सेवकाला व इतरांना मिळावी; कधीं कधीं पुष्कळ समुदाय असल्यास धुणीजवळ उभें राहून ज्यानें त्यानें त्या धुणिमाईमधून थोडी उदी आणून श्री साईमाउलीच्या हातांत द्यावी व त्या परमप्रिय व पूज्य माउलीनें आपल्या उजव्या हाताच्या आंगठयानें हमेशा त्या त्या भक्ताच्या भृकुटीच्या मध्यभागीं किंचित दाबून आणि बाकीच्या चार बोटांनीं त्या भक्ताच्या उघडया माथ्यावर त्या उदीच्या खुणा उमटाव्या असा हमेशचा प्रकार असे.

स्त्रियांच्या डोक्यावर त्यांच्या काळ्या केशामुळें त्या खुणा ठळक दिसाव्या.[1] कधीं कधीं कोणी तरी श्री साईमाउलीला श्रम न पडावे म्हणून पसा पसाभर उदी घेऊन श्रींच्यासमोर जरा बाजूस उभें रहावें, आणि त्याच्या हातांतून थोडी उदी घेऊन समोर उभ्या राहाणाऱ्या भक्ताच्या भालप्रदेशीं श्रींनीं स्वहस्तांनीं वर सांगितल्याप्रमाणें उदी लावावी, आणि नंतर त्याच्या हातांत थोडी उदी द्यावी. ती उदी मिळाल्यानंतर प्रत्येक भक्त श्रींच्या पायां पडून त्यांची रजा घेऊन "वाडयांत" जाऊन बसत असे.

हा प्रकार श्रींचें दर्शन झालेल्या हजारों स्त्री-पुरुषांच्या अनुभवांत आला आहे; परंतु ज्याना श्री साईमाउलीचें प्रत्यक्ष दर्शन झालें नाहीं, अशी जी जिज्ञासु भाविक मंडळी आहे त्यांच्यासाठींच हा लेख इतक्या विस्तारानें लिहिण्यांत येत आहे.

असो. या प्रमाणें प्रत्येक वेळीं थोडी उदी मिळवून जे पांच दिवस श्रींच्या पायांजवळ जात असत त्यावेळीं मिळवलेली उदी जपून मुंबईस आणण्यांत येत होती.

सन १९१० सालीं पहिल्यानें सप्टेंबर, व नंतर डिसेंबर अशा दोन वेळां श्रींचें दर्शन श्रीशिरडीस झालें होतें. तिसऱ्या खेपेस सन १९११ च्या

---

१ लेखकाच्या बायकोच्या एका घोर दुखण्यांत वांद्रें येथें त्याच्या राहात्या घरीं बाबांच्या उदीच्या अशा खुणा एकाएकीं उठलेल्या आमच्या दृष्टोत्पत्तीस आल्या आहेत आणि असें झाल्यानंतर तिच्या दुखण्यास उतार पडून ती बरी झाली आहे. त्या वेळीं तिला बाबा प्रत्यक्ष उदी लावतांना दिसले. आम्हांला मात्र त्या वेळेस दिसले नाहींत.

मार्च महिन्यांत होळीच्या सुटीचा फायदा घेऊन शिरडीस जाण्यासाठीं घरांतून दादर उतरतांना लेखकानें आपल्या बायकोचें केविलवाणें तोंड पाहून तिला श्री साईमाऊलीच्या दर्शनाची उत्कंठा लागली आहे असें जाणून लेखक दादर उतरावयाचा थांबला. नंतर झालेला संवाद:—

" तुला श्री साईबाबांच्या दर्शनाला यावयाचें आहे ? "

" हो. "

" पहा ! येथें तूं सुखासमाधानांत वाढलेली ! शिरडीस जाडेंभरडें अन्न खावयाला मिळेल ! जमिनीवर निजावें लागेल ! ओढयावर खुल्या जागेंत थंड पाण्याची आंघोळ ! गरम पाणी मिळावयाचें नाहीं ! कोठें तरी आडोशाला शौच्य करणें ! आपल्या हातांनीं कपडे धुणें ! खटाऱ्यांत बसणें वगैरे करणें भाग पडेल ! आहे तयारी ? "

" होय. "

"पाहा ! तेथें कांहीं तमाशा नाहीं. ( त्यावेळीं चावडीची थाटाची मिरवणूकही सुरू झाली नव्हती. ) श्री. साईबाबांवर तुझा पूर्ण विश्वास असेल आणि त्यामुळें तुझें कोट कल्याण होईल असा जर तुझा पक्का भरंवसा असेल तरच चल."

" माझा पक्का भरंवसा आहे. "

" तर मग एक लुगडें व एक चोळी इतकेंच कपडे बरोबर घे. गाडीला आतां वेळ राहिला नाहीं. "

" तिनें तावडतोब घरांत धांव मारून एक लुगडें व चोळी यांचें बोचकें बांधून, अंगावर शाल नाहीं, ( वीस वर्षांपूर्वीं शालीशिवाय घरांतून बाहेर निघणें हें कुलीन स्त्रियांना किती लाजिरवाणें वाटत होतें याची अलीकडील स्त्रीवर्गाला कदाचित् जाणीव असेल नसेल. त्यांनीं घरांतल्या वृद्ध व पोक्त स्त्रियांना याविषयीं विचारून पाहावें. ) अशा थाटानें अनवाणी पायांनीं जेव्हां लेखकानें आपल्या शक्तिशून्य अशा शरीरयष्टियुक्त परंतु निष्ठावंत स्त्रीला पाहिलें तेव्हां त्याला स्वाभाविक आनंद झाला.

असो. याप्रमाणें श्री साईमाऊली दर्शनोत्सुक स्वस्त्रीचा गौरव दुसऱ्या दिवशीं व त्यानंतर अनेक वेळां ती दर्शनाला गेली असत श्रीसाईमाउलीनें जो केला तो अवर्णनीय होता.

मुख्य गोष्ट उदी माऊलीची ! दुसऱ्या दिवशीं हमेशाप्रमाणें "उदी घ्या ! आणि वाड्यांत जाऊन बसा !" असा जेव्हां बाबांनीं हुकूम केला तेव्हां आम्ही सर्वांना इतरांप्रमाणें थोडी उदी घेऊन ती बाबांच्या हातीं देऊन, बाबांकडून ती भालप्रदेशीं व उघड्या माथ्यावर लावून घेऊन नंतर त्यांच्या हातांतून घेऊन त्यांच्या पायापडून बाजूला झालों. बायको धुणींतून पसाभर उदी घेऊन जेव्हां बाबांपुढें उभी राहिली तेव्हां लेखकाच्या पोटांत धस्स झालें कीं, बाबा इला खास रागें भरतील ! हा विचार मनांत येतांच बाबा म्हणाले,

"आये ! इतकी ग उदी कशाला ?" ती म्हणते, "बाबा ! उदी जवळ असली म्हणजे तुम्ही जवळ आहांत असें वाटतें."

"बरं बरं, जा घेऊन. **आपल्या बाळगोपाळांना ती लई कामाला येईल बरं ! जपून ठेवावी बरं.**" ती उदी बाबांकडून घेऊन कृपणाच्या पैशाप्रमाणें पदरांत तिची नीट गांठ बांधून नंतर ती पायां पडली.

असा प्रकार हमेशा होत असे. अनेक वेळां बाबांच्या दर्शनाला अनेक वेळां गेला असल्यामुळें लेखकाजवळ उदीचा सांठा झाला, आणि बायकोजवळ त्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठा सांठा झाला. इ. स. १९२५ सांत लेखकाची बायको श्री साईचरणीं लीन झाली. तिचा उदीचा संचय तिच्या कपाटांत जशाचा तसा आहे. तिचा सदुपयोग मुलें श्रींच्या इच्छेप्रमाणें लेखकाच्या मागें करतील याची त्याला पूर्ण खात्री आहे.

सन १९२४ च्या जुलै महिन्यांत रा. रा. दाभोळकर श्री शिरडी संस्थानचे आ. खजिनदार हे एकाएकीं निवर्तले आणि भक्तमंडळानें या जबाबदारीच्या जागेवर लेखकाची नेमणूक केली.

वर्गणीदारांची वर्गणी उत्सवांसाठीं अथवा संस्थानाप्रीत्यर्थ येत असतां, त्या त्यांच्या प्रेमाचा बदला आपल्या हातून जरूर देण्यांत यावा-जेणें करून त्यांच्या कायिक, वाचिक, मानसिक व अध्यात्मिक उन्नतीला प्रोत्साहन मिळावें. याचा विचार करतानां एकाएकीं वरील वर्णन केलेल्या प्रसंगाची व श्रीसाईमाउलीच्या शब्दांची आठवण होऊन, कंठ सद्गदीत झाला; प्रेमानें श्रींच्या तसबिरीपुढें लोटांगण घातलें; खण उघडून उदीमाउलीला प्रेमानें वंदन केलें आणि पावती

देतांना प्रत्येकाला **तीन चिमूट** उदी त्या पावतीसोबत पाठवितांना "श्री साईबाबांच्या हातची उदी" असें त्या उदीच्या पुडिकेवर लिहिण्यांत आलें आणि अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना आपण बाबांच्या **बालगोपालांच्या** ऋणांतून अंशरूपानें तरी मुक्त होत आहोंत असें वाटावयास लागलें.

पहिल्याच प्रसंगीं पुण्याच्या एका स्नेह्याकडून फटका बसला. उदीची पोंच मिळतांच "ही उदी तुमच्या हातून चिरायू होवो" अशा अर्थाचें पत्र आलें. प्रथमदर्शनीं आपल्या कृतीवर अविश्वास असल्याचें हें द्योतक आहे म्हणून किंचित् वाईट वाटलें; पण खरी हकीकत त्या गड्याला माहीत नसल्यामुळें त्या-विषयीं वैषम्य न वाटूं देतां हा आशीर्वादच आहे असें मानून श्रींच्याच पदरीं हमेशप्रमाणें गळ घालून स्वस्थ बसलों.

सर्वांना सारखी **तीन चिमूट** उदी द्यावयाचीच. मग त्याच्याकडून अल्पस्वल्प अथवा कितीही मोठी वर्गणीची रक्कम येवो, असा प्रघात ठेवला. हळू हळू उदी संपुष्टांत येऊं लागली आणि पुढल्या बारा पंधरा महिन्यांनीं उदी संपून वयपरत्वें श्रींची आज्ञा होऊन त्यांच्या चरणीं लीन होण्याचा सुदिन लाभावा असें वाटलें. आतां तो दिवस केव्हां तरी यावयाचाच, असें आहे. तयारी श्रीकृपेनें असावी ही चरणापाशीं विनंति, याप्रमाणें नोकरी चाकरी व इतर व्यवसाय हे चालत असतां, या चालू वर्षाच्या प्रारंभीं कै. दाभोळकरांच्या चिरंजीवांनीं दोन मोठे डबे "श्री साईबाबांच्या हातची उदी" असे चिठी लावलेले घरीं पाठविले. ते डबे पाहातांच अत्यंत आश्चर्य वाटलें. ही उदी पांच वर्षें सहज पुरेल, असें वाटतें.

कै. दाभोळकरांच्या चिरंजीवांना या उदीच्या अस्तित्वाची फारशी माहिती नसावी; परंतु घराची सर्व व्यवस्था लावीत असतांना हे डबे त्यांच्या पाहाण्यांत येऊन, कोणीतरी "राख समजून टाकून देईल या भावनेनें प्रेरित होऊन लेखकाकडे ज्या प्रेमभावानें ते पाठविले आहेत त्याविषयीं श्री साईमाऊलीचें भक्तमंडळ त्यांचे जरूर आभार मानतील याची लेखकाला पूर्ण खात्री आहे.

कै. दाभोळकरांच्या घरीं "श्रींच्या हातच्या उदीचे" डबे असावे याची लेखकाला मुळींच जाणीव नव्हती. ज्यांना या सर्व साईबाबांच्या खेळाच्या

भाकडकथा वाटत असतील त्यांना तसें खुशाल वाटावें; परंतु ज्या प्रेमयुक्त अनुभवांनीं श्री साईमाऊली,आपल्या स्थूल देहाच्या पतनानंतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आपल्या अतुल व अवर्णनीय अशा उदीच्या प्रभावांनीं आपलें सामर्थ्य ज्यांना प्रत्ययास आणीत आहे त्यांना श्री साईचरणापाशीं विशेष अशा दृढतर बंधनाच्या सप्रेमयुक्त भावनांनीं जखडले जाऊन संसाराच्या आपत्तींविषयीं निर्भय वृत्तीनें राहाण्याचा अभ्यास होऊन, आनंद वाटणारच आणि त्यांची वृत्ति आनंदमय अशी राहणार.

श्री. साईमाऊलीच्या स्थूलदेह पतनानंतर फक्त २४ तास धुणी प्रज्वलित नव्हती. त्यानंतर ती आजतागायत रात्रंदिवस ज्वलित आहे. तिच्यांतली उदी केव्हांही निखालस संपण्यांत आली नव्हती; यामुळें श्री धुणीमाऊलीच्या प्रज्वलित असणाऱ्या उदीचा प्रभाव यत्किंचितूही प्रकारानें गौण आहे, असें मुळींच नाहीं.

ज्यांना ज्यांना विशेष क्रियेसाठीं विशेष प्रमाणावर उदीची गरज लागते त्यानां त्यांच्या धर्मकृत्यासाठीं धुणीमाऊलींतली उदी पाठविण्याबद्दल श्री शिरडींतील योग्य अधिकाऱ्यांना कळविण्यांत येतें.

वरीलप्रमाणें ' श्री साईबाबांच्या हातची उदी " जी सध्यां पाठविण्यांत येत आहे व पुढेंही पाठविण्यांत येईल त्या उदीची हकीकत आहे. केवळ निरुपायामुळें लेखकाला स्वतःच्या घरच्या मंडळीचा उल्लेख करणें भाग पडलें आहे, त्याबद्दल श्रींचें भक्तमंडळ त्याला क्षमा करतील अशी त्यांच्या चरणापाशीं अत्यंत नम्र विनंति आहे. सर्व हकीकत खुलासेवार लिहिण्याखेरीज "आपल्या बालगोपाळांना लई कामाला येईल" व "जपून ठेवावी बरें" व या गोड शब्दांचा गर्भितार्थ कळावा कसा ? म्हणून ज्यानें त्यानें आपआपल्यापाशीं सूक्ष्म विचार करून बाबांच्या या उदीद्वारें त्यांच्या अतर्क्य व अवर्णनीय प्रेमाविषयीं आपल्या अंतःकरणांत खूण पटवावी. आणखी तें काय लिहावें बरें!

सर्व भक्तांचा चरणरज,

वांद्रें,
ता. ९ जानेवारी १९३२.

**रा. आ. तर्खड,**
संपादक.

# अनुभव

श्री. शंकरराव गवाणकर यांचे अनुभव पाठविणार श्री. वासुदेव लक्ष्मण गवाणकर, रहाणार पायें, पो. वसई. ता. १०-१२-१९३१.

१. इ. स. १९११ सालीं श्रीयुत शंकर लक्ष्मण गवाणकर हे साईबाबांच्या दर्शनास गेले होते. त्यांचेबरोबर त्यांचेच एक पंजाबी मित्र होते. आगगाडींत साधुसंतांविषयीं दोघांचें बोलणें चाललें असतां पंजाब्यानें चमत्कारांविषयीं श्री. शंकररावांजवळ बोलणें चालविलें. सर्व साधुपणा चमत्कारांत भरलेला आहे अशी त्याची समजूत होती. श्री. शंकररावांनीं त्या पंजाब्याची बरीच समजूत केली. चमत्कारांत साधुपणा नाहीं, चमत्कार करणारे सर्वच साधु नव्हेत, चमत्कार ही गौण बाब आहे वगैरे गोष्टी सांगितल्या. पुढें बाबांचे दर्शनास गेल्यावर बाबा त्या पंजाब्यास म्हणाले, "अरे मी गारुडी आहें काय ? मजजवळ गारुडयाची विद्या आहे काय ? तूं मजजवळ कां आलास ? गारुडयाकडे जा."

२. एक फॉरेस्ट कॉंट्रॅक्टर साईबाबांच्या दर्शनाला गेले होते. बाबा त्यांस म्हणाले, "अरे, माझे लचके काढलेस ! हाय ! हाय ! माझे हात तोडलेस ! माझे पाय तोडलेस ! येथून चालता हो !"

३ वसईचे एक गृहस्थ गरमीच्या विकारास पुष्कळ उपाय करून केल्यानंतर शेवटचा उपाय म्हणून पांचशें रुपये घेऊन साईबाबाकडे गेले. साईबाबा त्यांजवर रागावले व त्यांस म्हणाले, "अरे, मजकडे कशाला आलास ? मला तुझे रुपये नकोत. तुझ्या घरीं ती तुझी 'ठेवलेली' आहेना तिला दे. तुझ्या रुपयांना मी भुलणार नाहीं." आपला अपमान झाला असें वाटून हे दुर्दैवी राजश्री घरीं परतले.

४. श्री. शंकरराव हे बाबांच्या दर्शनास गेले त्या वेळीं बाबा फारच रागावलेले होते. मंडळी लांब अंतरावर उभी होती. कांहीं वेळानें बाबा शांत झाले. तेव्हां मंडळी त्यांचे दर्शनास जाऊं लागली. बहुतेक सर्वांनीं बाबांजवळ आपलीं संसारांतील रडगाणीं सुरू केलीं. सर्व मंडळी दर्शन घेऊन गेल्यानंतर श्री शंकरराव व त्यांचा मित्र असे दोघेच तेथें राहिले. बाबा त्यांना

म्हणाले, "देखो, सब आते है और कहते है, बाबा देवो देवो; मै कहता के लेवो लेवो, कोई साला लेता नहीं."

५. वसईहून एक बाई साईंच्या दर्शनास गेल्या होत्या. त्यांची दृष्टि गेलेली होती. त्या बाबास म्हणाल्या, "बाबा! या डोळ्यांनीं आपणांस पाहावें अशी इच्छा आहे." असें म्हटल्याबरोबर तिला दृष्टि आली, व तिनें साईबाबांस डोळे भरून पाहिलें. मशिदीच्या बाहेर पडतांच ती पूर्ववत् अंध झाली.

६. वसईचे कै. बाबा वखारकर यांनीं कै. सखाराम गोलतकर यांजकडे केळ्याचा फणा श्री साईंस देण्याकरितां दिला. कै. गोलतकर यांस शिरडीस गेल्यावर तो फणा साईंस देण्यास विस्मरणामुळें उशीर झाला. श्रीसाई त्यांस म्हणाले, "अरे त्यांतलें एक केळें लवकर आण, तो अजून जेवला नाहीं. 'मी केळें खाल्लें अशी तार कर, त्याला लवकर जेवूं दे.' कै. वखारकरांनीं, 'बाबानीं केळें खाल्लें म्हणजे मला तार कर' असें गोलतकरांस सांगितलें होतें, व घरीं तारेची वाट पहात ते बसले होते.

पहिले ४ अनुभव शंकररावांनीं सांगितले व दुसरे २ एका गृहस्थानें सांगितले. सर्व अनुभव विश्वसनीय आहेत.

वरीलप्रमाणें अनुभव श्री. वासुदेव लक्ष्मण गवाणकर यांनीं पाठविले आहेत. 'चमत्कारा'विषयींचा एक लेख लिहिण्याचा विचार आहे. श्रींच्या इच्छे प्रमाणें तो पुढल्या कोणत्या तरी अंकांत प्रसिद्ध व्हावा अशी आशा आहे. दरम्यान श्री. चिंतामण विनायक वैद्य यांनीं "हिंदुधर्मतत्वें" या आपल्या अप्रतिम ग्रंथांत "चमत्कारां"विषयींची गोड मीमांसा केली आहे ती सर्व जिज्ञासूंनीं जरूर वाचावी.

वांद्रें,
ता. २८ जानेवारी १९३२.

संपादक,
**रा. बा. तर्खड.**

# अनुभव

रा. रा. दाजी विठ्ठल सांबारे हे पार्ल्याचे सद्‌गृहस्थ श्री साईबाबांच्या निस्सीम भक्तांपैकीं एक आहेत. दाजीसाहेब या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेला आपली त्रैमासिक वर्गणी व इतर स्नेह्यांची वर्गणी देण्यासाठीं लेखकाच्या घरीं आले होते; त्या वेळीं त्यांनीं स्वतःचा अनुभव सांगितला तो येणेंप्रमाणें:—

सन १९१५ सालीं त्यांना श्री. साईबाबांचें प्रथम दर्शन शिरडीस झालें आणि त्यावेळीं त्यांना जो श्रींच्या पायांपाशीं अनुभव आला त्यावरून श्रींच्या पायीं अढळ निष्ठा वाटून श्रींचें एक छायाचित्र आपल्या घरीं ठेवून त्याची प्रेमभावानें ते पूजाअर्चा करूं लागले. परंतु त्या छायाचित्रानें त्यांना समाधान न होऊन श्रींचें एक उत्तम पेन्टिंग असावें असें त्यांना वाटलें व त्याप्रमाणें श्री साईलीलेच्या पृष्ठभागावर असलेलें एक चित्र काढून त्यांनीं आपले स्नेही रा. बावडेकर—जे एक आर्टिस्ट आहेत त्यांना त्यावरून एक सुबक पेन्टिंग करून आपणांस द्यावें असें विनविलें. स्नेही म्हणाला, "तुला बाबांचें पेन्टिंग पाहिजे ना ? मीं तें तुला देईन. ? "

तिसऱ्या दिवशीं एक भलें थोरलें पेन्टिंग घेऊन श्री. दाजीसाहेबांचा स्नेही त्यांच्या घरीं आला. चित्र पाहून दाजीसाहेबांना अत्यंत आनंद वाटला आणि ते मित्राला म्हणाले, "अरे हें पेन्टिंग तूं दोन दिवसांत कसें केलेंस ? " तो मित्र म्हणाला, "अरे हें पेन्टिंग दोन वर्षांपूर्वीं केलें आहे, त्याच्या फ्रेमीला आठदहा रुपयांचा खर्च झाला आहे. आज दोन वर्षें वाट पाहात आहें कीं, कोणी रसिक हें चित्र खरीद करून माझ्या श्रमाचा मला मोबदला देईल; पण दोन वर्षें झालीं, कोणीही गिऱ्हाईक मिळालें नाहीं. मी बाबांच्या दर्शनाला गेलों नाहीं हें तुला ठाऊक आहे. केवळ कल्पनेनें छायाचित्रें पाहून हें चित्र तयार केलें, आणि तें केवळ तुझ्याचसाठीं हें झालें असावें असें मला आतां वाटलें. दोन दिवसांपूर्वीं तूं चित्र तयार करावयास सांगितलेंस आणि श्री साईबाबांवरची तुझी निष्ठा व तुझे अनुभव मला ठाऊक असल्यामुळें, मीं

२८४२

काढलेलें चित्र—ज्याची जाणीव तुला नव्हती—तें चित्र तुझ्याचसाठीं चितारलेलें असावें अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. तुला मी तें बंधुभावानें, प्रेमपूर्वक अर्पण करितों, त्याचा तूं स्वीकार कर. ”

बाबासाहेब तें चित्र इतकें गोड आहे कीं, आपण तें जरूर एक वेळ येऊन पाहावें. तसें करण्याचें कबूल केल्यावर दाजीसाहेब निघाले.

ग. आ. नर्वड.

**संपादक.**

# अनुभव

फार दिवस लोटले. सन १९२३ सालानंतर सर्व मंडळींचा एकत्र शिरडीस जाण्याचा योग जुळून येत नसे; त्यामुळें सर्वजणांना पूर्वीप्रमाणें एकत्र जाऊन शिरडींत श्री साईमाउलीचें दर्शन केव्हां घडेल अशी उत्कंठा व आतुरता लागली होती. मुलांच्या प्रकृतीमुळें आगगाडींतून रात्रीं मनमाडचा प्रवास व गाडया बदलणें, कोपरगांवाहून पुढें शिरडीस जाणें, वगैरे थंडीच्या दिवसांत अत्यंत अडचणीचें असें भासत होतें. म्हणून मोटरबसनें सकाळीं ८ वाजतां निघून संध्याकाळीं ६च्या आंत दिवसा शिरडीस पोंचावें असा विचार करून मोटरचा बेत ठरविला.

१८ माणसांची बस सोईवार पडेल म्हणून पसंत केली; पण घर सोडतां सोडतां कांहीं कांहीं कारणामुळें १२ वाजले. ता. २७ डिसेंबर रविवारचा तो दिवस होता. वाटलें कीं, शिरडीस जाण्यास जरी ८ तास लागले तरी निदान ८ वाजतां (संध्याकाळचे) शिरडीस पोंहचूं.

आमचा बेत शिरडीस एकच दिवस राहाण्याचा होता. तेथून पंढरपूर, सज्जनगड, जेजुरी, भीमाशंकर करून ता. ३ जानेवारीला घरीं परत यावयाचें ही आमची इच्छा; पण श्री साईमाउलीची लीला निराळीच होती.

सान्ताक्रुझ सोडून कुर्ल्याच्या आंत पहिल्या पंक्चरनें एक तास घेतला, दुसरे दोन तास भिवंडीजवळ नाशिकरोडच्या नाक्यावर घेतले व थळघाट

रात्रींत ड्रायव्हरच्या दक्षतेमुळें खबरदारीनें पार पडून रात्रीं ११॥ वाजतां पंचवटीवर मोटर उभी केली. तेथें चवकशी करून ड्रायव्हरनें थेट मनमाडचा रस्ता धरला.

सकाळीं ५ चे सुमारास येवलें सोडलें; पुन्हा मोटारला वाटलें कीं, आतां रात्र संपून दिवस उजाडतो म्हणून त्या मुदतीनें पंक्चर झाली. तेथेंच ७॥ वाजले. श्रीगोदावरीवर ८॥ वाजतां आलों. स्नानें झालीं. कोपरगांवाहून पुढें १ मैलावर पेरूचा बाग आहे. तेथें बागेंतून पेरू घेऊन शिरडींत १०। वाजतां सोमवारीं पोहोंचलों व ८ तासाच्या प्रवासास ही मोटार २२ तास घेते हें दिसून आलें.

शिरडींत पोंचल्यावर तेथल्या तात्याजी पाटील वगैरे मंडळींनीं सर्व मंडळींला घेऊन फार दिवसांनीं आलांत, तेव्हां गुरुवारची चावडी व पालखी झाल्याखेरीज म्हणजे शुक्रवारापूर्वी जाऊं नका असा फार आग्रह केला; व आमचीं सर्वांचीं मनें बाबांनीं इतकीं ओढलीं कीं, नाताळची सर्व रजा शिरडींतच काढून शेवटचे दिवशीं निघून थेट घरीं जावें असें वाटूं लागलें, आणि शिरडींत त्याप्रमाणें राहाण्याचा बेत ठरविला, व पंढरपूर, जेजूरी वगैरे ठिकाणीं आमचा येण्याचा बेत रहित झाला आहे, अशीं पत्रें पाठविलीं. गुरुवारीं सकाळीं शिरडीहून शुक्लेश्वर, कचेश्वर व पुन्हा कोपरगांवीं आलों व दोनप्रहरीं शिरडींत भोजन आटोपून मोटारनें राहत्याच्या बाजारांत गेलों. तेथून परत ७ वाजतां आलों. रात्रींचा पालखीचा समारंभ पाहून मनास फार आल्हाद झाला. शुक्रवारीं सकाळीं इ. स. १९३२ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेला ९॥ वाजतां शिरडी सोडून संगमनेरला सुखरूप पोंचलों.

परत जातांना श्रीभीमाशंकरास जाऊन, जुन्नर तळेगांवच्या रस्त्यानें मुंबईस जावें असा आमचा बेत होता; पण तो बाबांचा बेत नव्हता. मुंबईहून शिरडीस जातांना रात्रीचा प्रवास जरी बाबांनीं निर्विघ्नपणें पार पाडला होता तरी परत जातांना, होतां होईल तों रात्रीं ७ नंतर प्रवास न करितां, वस्तीच्या ठिकाणीं मुक्काम करावा असें तात्या पाटलांनीं सुचविलें होतें, व तें आमच्या निश्चयाप्रमाणेंच होतें. उथा नारायण गांवीं आम्ही दुपारचा चहा घेऊन जुन्न-

रच्या रस्त्यानें भीमाशंकरास ६ वाजतां पोंचूं असें मानीत होतों. त्या नारायणगांवींच आम्ही रात्रीं ७ वाजतां पोंचलों. तात्या पाटलांनीं सांगितल्याप्रमाणें भिमाजी पाटलाची चवकशी करितां ते पुण्यास गेले होते असें कळलें.

आतां कोणत्या ठिकाणीं मुक्काम करावा या विचारांत आम्ही पडतों न पडतों तोंच बाबांची लीला सुरू झाली, ती अशीः—

ज्या पोलिस शिपायानें सांगीतलें कीं, भिमाजी पाटील पुण्यास गेले त्यानेंच आमचा सर्व प्रोग्राम ऐकून घेऊन एकदम म्हटलें, "प्रधानसाहेब! आपण मला ओळखलें नाहीं, पण आपणांस मी ओळखतों. आपण खडकींत असतांना आपल्या बंगल्यावर फौजदारसाहेब मला पाठवीत असत. येथून जुन्नर ७ मैल आहे; पण जुन्नरहून भीमाशंकराची वाट फार बिकट आहे. रात्र झाली आहे. आपल्याबरोबर लहान लहान मंडळी आहे. येथें जवळच फौजदार कचेरी आहे. फौजदार आले म्हणजे आपली सर्व व्यवस्था नीट लागेल."

फौजदारांस बातमी कळविली व फौजदारांनीं रात्रीं इन्स्पेक्शन बंगल्यांत उतरण्याची व्यवस्था केली. भोजन करण्याची सर्व व्यवस्था लावून दिल्यावर "स्वस्थ झोंपा व उद्ईक उठल्यावर पुढचें पाहूं."

आम्ही भोजन करून सुखानें झोंपलों. फौजदारांनीं जातांना आमच्या नोकरास व ड्रायव्हरास आमच्या अपरोक्ष अशी ताकीद दिली कीं, "मंडळी सकाळीं उठली कीं, सर्व सामानसुमान व्यवस्थेशीर बांधून मोटारीवर चढवा. बंगल्याच्या रखवालदाराला उठल्यावरोबर गरम पाणी स्नानें करण्याकरितां तयार ठेवून स्नानें उरकून घ्यावीं." सकाळीं उठल्यावर फौजदारांची ताकीद नोकरांनीं कळविली. आम्ही त्याचा अर्थ समजलों कीं, सकाळच्या वेळीं आमच्या सामानाचा कांहींसुद्धां उपयोग होऊं द्यावयाचा नाहीं, आणि सर्व सामान मोटारींत चढवावयाचें. त्याप्रमाणें आम्ही करीत असतां, एक ब्राह्मण चहा व फराळाचें घेऊन आला. आम्ही स्नानें केलीं, चहा व फराळ केला, आणि मोटरींत बसलों. बरोबर मोटर पुन्हा पंक्चर झाल्यास साहित्य घेतलें.

फौजदारसाहेबांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन शनिवारीं सकाळीं ८॥ वाजतां नारायणगांव सोडलें. मोटर जी तेथून निघाली ती सारखी खेडला

आली. त्यानंतर पुन्हा पंक्चर झाली नाहीं; पण पुढें रस्त्यांत स्प्रिंग तुटल्यावर श्रीभीमाशंकरास ही मोटार नेली नाहीं, हें शहाणपण झालें. पण आतां कसें काय ? इतक्यांत जवळच्या शेतांत एक लोहार दिसला. आसपास वस्ती नाहीं. अशा ठिकाणी स्प्रिंग तुटते काय व बाबा तेथेंच एक तज्ज्ञ लोहार ठेवतात काय ? सर्वच अतर्क्य व अत्यंत आश्चर्यकारक. त्या लोहारानें जेमतेम ती स्प्रिंग दुरुस्त केली आणि त्या मोडक्या स्प्रिंगच्या आधारानें आम्ही जेमतेम तळेगांवीं रात्रीं ८ वाजतां पोंचलों; व तेथून रेल्वेनें घरीं जावें असा बेत केला. चवकशी करतां रात्रीं एक वाजतां एक गाडी आहे त्यानंतर दुसरी सकाळीं ८ वाजतां आहे असें समजलें.

ही चवकशी तळेगांवच्या नाक्यावर करतों, तों तेथें ड्रायव्हरच्या ओळखीचा एक मुसलमान कारगीर जो नेहमीं मोटारीस कांहीं तुटातुट झाल्यास रिपेर करण्याचा धंदा करितो तो तेथें आला व त्याच क्षणीं तेथले श्रीयुत बाबुराव महादेव भालेराव पेट्रोल एजन्ट हे तरुण गृहस्थ सायकलवर बसलेले आमच्या मोटरजवळ आले. श्री. भालेरावांनीं रात्रीस घरीं उतरण्याचा आग्रह केला व त्या मुसलमानानें ड्रायव्हरला आश्वासन दिलें कीं, रात्रीच्या आंत नवी स्प्रिंग मोटारला बसवून देतों.

अर्थात तळेगांवीं रात्रीस वस्ती केली. श्रीयुत भालेरावांच्या घरासमोर श्री. तुकाराममहाराजांनीं स्थापन केलेलें श्री.विठ्ठलाचें मंदीर आहे. श्री विठ्ठलाचें दर्शन घेतलें. नंतर भोजन करून स्वस्थ सुखानें झोंपलों. सकाळीं तळेगांवचा बाजार केला. मोटर तयार झाली. नऊ वाजतां तळेगांव सोडलें. श्री. भालेराव सायकलवर बरोबर होते. सुमारें एक मैलावर कांचेचा कारखाना आहे. आम्ही सर्व उतरून तो कारखाना पाहिला. नंतर या प्रकारचें एखाद्या संतास शोभेल असें वर्तन करून श्री. भालेराव परत गेले. आमची मोटर ११ च्या सुमारास श्री एकवीरा देवीच्या पायथ्याशीं आली. आम्हीं वर चढलों. श्रीदेवीचें दर्शन घेतलें . लेणीं पाहिलीं, चहापाणी व फराळ करून एकाच्या सुमारास खालीं उतरलों. श्रीमातेचे पूजारी आमच्या मोटारीनें सोबत होते. त्यांना लोणावळ्यास उतरविलें.

पुढें बोरघाटाचा प्रवास सुखाचा झाला. पनवेल गांठलें. मोटर पंक्चर झाली नाहीं. स्प्रिंग नीट आहे तर पेट्रोल नीट मशीनमध्यें गळेना म्हणून संध्याकाळीं सहाच्या सुमारास रस्त्यांत खोळंबा झाला. नंतर घंटाळीचें दर्शन ८ वाजतां होऊन रात्रीं १० वाजतां सान्ताक्रूझला घरीं परत आलों.

घरीं आल्यावर कळलें कीं, मोटारच्या धन्याच्या वाईटावर असलेल्या कोणी इसमानें मोटार शिरडी वगैरे लांबच्या ठिकाणच्या प्रवासास जावयाची आहे हें जाणून मालकावर मोठी आफत यावी म्हणून व मोटारचा रस्त्यांत खुर्दा व्हावा या हेतूनें त्याच्या इंजिनांत जागोजाग फेरफार करविले होते; पण आम्ही बरोबर घेतलेले ड्रायव्हर कामांत फार दक्ष व श्री साईबाबांचे भक्त असल्यामुळें त्यांनीं श्री साईबाबांच्या कृपेनें मोटर थेट शिरडीस वर वर्णन केल्याप्रमाणें नेली व जीं जीं अरिष्टें वाटेंत आलीं त्यांचें निवारण होऊन श्री साईबाबांनीं सर्व मंडळीस सुखरूप घरीं आणलें.

अर्थात् ही मोटार बंगाल्यांतून बाहेर पडल्यापासून ८ दिवसांनीं पुन्हा घरीं परत येई तोंपर्यंत तिच्याभोंवतीं जणूं काय बाबाचें सुदर्शनच फिरत होतें. नाहीं तर त्या मोटारीचा रस्त्यांतच चक्काचूर होऊन भयंकर अपघात झालाच असता.

तीच मोटार आमच्या घरून मुंबईंत कारखान्यांत रिपेर करण्याकरितां नेण्यास ३ ग्यालन पेट्रोल खर्च झालें. त्या हिशोबानें आमच्या सर्व प्रवासाला पेट्रोलचे १२५ ग्यालन खर्च झाले पाहिजे होते. तेथें फक्त ३० ग्यालनचाच उपयोग झाला, याहून आश्चर्य तें काय ! श्री साईबाबांची लीला अगाध आहे याचा प्रत्यय आम्हां सर्वांना वरील प्रवासांत जागोजागीं व क्षणोक्षणीं आला, आणि त्यांचे गुणानुवाद सप्रेमपूर्वक गाण्यांत आमचा वेळ गेला.

अगाध लीला बाबांची.

साई–प्रधान बाग, सान्ताक्रुझ,
ता. १० जानेवारी १९३२.

आपली नम्र,
**सौ. छोटूबाई मो. प्रधान.**

I, Hari Sitaram Dikshit of Vile Parley Hindu Inhabitant make this my last Will and Testament.

I, hereby revoke all Wills or Testamentary writings heretofore made by me.

I appoint my brother Sadashiv Sitaram Dikshit and my elder son Ramkrishna alias Babu the Executors of this my Will.

I own a piece of land at Shirdi on a portion of which my friend the late Gopal Makund alias Bapusaheb Buti has put up a structure with my consent. I intend to transfer that and to the Trustees of the Shirdi Sansthan for the use and benefit of that Sansthan. If I happen to die without transferring the said land to the said Trustees my Executors should transfer the same to them.

As to the house or wada built by me at Shirdi I direct the hall on the ground floor and the two front rooms and the verandah in front as also the two tin roofed sheds at the back be reserved for devotees visiting the Shrine of Shri Sai Baba and making a temporary stay at Shirdi. The central portion of the wada consisting of a quadrangle and Western and Eastern rooms and inside verandah as also the hall on the upper floor shall be at the sole disposal of my heirs. I, however, wish that they should not be sold or let.

Some moneys are due to me by my friend Mr. Sitaram Yeshwant Dalvi and his wife Jankibai on the security of certain life policies. The amount due will be about Rs. 7,000. I, however, direct my Executors should give a discharge on receiving only Rs. 5000 Five thousand.

I devise and bequeath all the rest residue and remainder of property movable and immovable to my two sons Ramkrishna alias Babu and Balkrishna alias Bal for their absolute use and benefit in equal shares.

In witness whereof I have put my hand to this Will (written solely in my own handwriting) at Vile Parle in the Thana District this 13th day of November 1922.

HARI SITARAM DIKSHIT.

Codicil to the Will made by me on 13th November 1922.

I have promised a donation of Rs. 1000 One thousand to the permanent Fund of the Shirdi Sansthan. So much of it as may remain unpaid at the time of my death should be paid by my Executors. They should also pay my nephew Madhav a legacy of Rs. 500 Five hundred.

Vile Parley,

14th June 1924. HARI SITARAM DIKSHIT.

## सूत्र ६१. ॥ लोकहानौ चिंता न कार्या, निवेदितात्मलोकवेदत्वात् ॥

**आर्या** ॥ प्रापंचिक कार्यें जरि, असिद्ध झाली तरी नको चिंता ॥
॥ कां कीं सर्वचि कार्यें भक्तांचीं घडति **सांइ** नाथार्थी ॥

**विवरण**—भक्ताला आपलीं सकल कर्में जर केवळ ईश्वरार्पण बुद्धीनेंच करावयाचीं असतात ( भ. गी. ३—९ ) तर अर्थात् त्या कर्मांचीं फलेंही ईश्वराकडेच जाणार. ईश्वरेच्छेनें भक्तांचीं कर्में सफल झालीं, किंवा निष्फल झालीं तरी भक्तांना सकर्मफलभूत लाभ-हानिविषयीं हर्षशोक मानण्याचें कारणच नाहीं; कारण भक्तांच्या मनांत अहंकर्तृत्वभाव नसतो. कर्ता करविता परमेश्वर आहे, अशी भावना असल्यावर कर्मांच्या सफलतेबद्दल किंवा निष्फलतेबद्दल आपल्याकडे जबाबदारी राहातच नाहीं. ईश्वरेच्छानिर्मित प्रकृतिधर्मानें जीं कर्में घडतात, त्यांचा **स्वतः** आपल्याशीं कांहींएक संबंध नाहीं, असें समजून आपण त्यांच्या फलांकडेही दृष्टि देऊं नये; आणि प्रकृतीचें यत्किंचितही ओझें आपल्या स्वतःच्या माथीं घेऊं नये. काया, वाचा आणि मन ईश्वरास समर्पण केल्यावर " मी " आणि " माझें " असें म्हणण्याला **स्वतः** भक्तापाशीं कांहींच राहात नाहीं.

आतां येथें "**स्व**" ह्या शब्दाचा अर्थ काय आहे, त्याचा विचार करूं. हा शब्द सर्वव्यापी आत्मरूपदर्शक आहे. मनुष्य स्वतः, पक्षी स्वतः, कीटक स्वतः, वृक्ष स्वतः, वल्ली स्वतः, आकाश स्वतः, वायु स्वतः, तेज स्वतः, आप स्वतः, पृथ्वि स्वतः, दीप स्वतः, रज्जू स्वतः, सुवर्ण स्वतः, इत्यादि शब्दप्रयोगांवरून त्याचें सर्वव्यापी आत्मस्वरूपदर्शकत्व सिद्ध होतें. अर्थात् हा सर्वव्यापी "**स्व**" म्हणजेच अनंत सच्चिदानंदमय आत्मा होय. आणि म्हणूनच आत्मज्ञानी पुरुषाच्या दृष्टीनें **स्वधर्म** ह्याचा अर्थ-**निष्कर्मता** असा होतो; कारण सर्वात्मक **अद्वैत** वस्तूच्या ठिकाणीं कोणताही कार्य, कारण कर्तृत्वादि **द्वैत भाव** संभवत नाहीं. ह्या दृष्टीनें **आत्मज्ञानी पुरुष अतिवर्णाश्रमी असून कर्मातीत असतो;** ( भ. गी.

४-३३ ). त्याच्या देहेंद्रियप्राणमनादिद्वारा प्रकृतिवशात जीं कांहीं कर्मे सहज अथवा बुद्धिपुरःसर घडतील, त्यांच्या ठिकाणीं त्याला अहंकर्तृ स्वभाव नसल्यामुळें तीं त्यानें **स्वतः** केलीं असें होत नाहीं, आणि म्हणूनच तीं त्याला बाधक होत नाहींत. ( भ. गी.३—१८; ३—२७; ४—३७; १८—१७ ), असा भगवद्गीतेचा ठाम सिद्धांत आहे. ह्याचा अर्थ असा होत नाहीं कीं, समाधिअवस्थेंत नसतांनाही ज्ञानी पुरुष जड पदार्थासारखा निष्क्रिय असतो, असें समजणें हें महामौर्ख्य आहे. तो प्रकृतिधर्मानेंच **" अद्वेष्टा सर्व भूतानाम् "** असा असल्यामुळें सर्व भूतांशीं म्हणजे त्याच्याकडे जे कोणी लोक जातात त्यां सर्वांशीं सारख्या मित्रभावानें वागून **परोपकार**बुद्धीनें त्यांच्यावर **करुणादृष्टि** ठेवितो ( भ. गि. १२—१३ ). तो लोकांपासून मान इच्छित नाहीं, दांभिकपणा करीत नाहीं, कोणाचीही जिवाची हिंसा करीत नाहीं, शांत असतो म्हणजे जरी त्याचा कोणी छळ केला तरी तो त्याच्यावर क्रोध करीत नाहीं, नेहमीं आपलें वर्तन सरळ ठेवितो. शुद्धचित्त असतो, स्थिरबुद्धीचा असतो, आत्मसंयमी असतो, वैराग्ययुक्त असतो, अहंभावरहित असतो, प्रायः अरण्यवासी असतो, ईश्वराचा एकनिष्ठ भक्त असून ज्ञानपर असतो, ( भी. ग. १३—७ते११ ). अशा अनेक, अमोल, भगवद्गीतोक्त शुद्ध सत्वगुणमंडित, रागद्वेषरहित ( भ. गी. ५—३ ) ज्ञानी संन्यासी पुरुषांकडून सहज होत असलेल्या शुद्ध सात्विक कर्मांपेक्षां अहंममता-मूलक रजप्रधान अथवा तमप्रधान असलेलीं साहंकार कर्मे अधिक बरीं म्हणणें, हें घोर अज्ञान होय.

व्यवहारांत जसे अनेक दांभिक लोक प्रतिष्ठित दिसणारे धंदे करून अज्ञजनतेकडून आपल्या पोळीवर तूप ओढून घेतात, त्याचप्रमाणें आध्यात्मिक धंदेवाले वागत असतात. ह्यांचा धंदा विशेषेंकरून स्त्रिया आणि अज्ञजन ह्यांच्या सहाय्यानें चालतो; पण त्याला उपाय नाहीं. कितीही शिक्षणप्रसार झाला तरी भोळे, अंधश्रद्धावान, अविचारी लोक ह्यांचा जगांत नेहमीं बराच भरणा असणार; आणि तो आहे तोंपर्यंत सर्व दांभिक लोकांचें चांगलेंच फावणार. प्रतिष्ठित दिसणाऱ्या असंख्य दांभिक व

व्यावहारिक धंदेवाइकांपैकींच कांहींचा हा धंदा असतो. परमपूज्य मित्र ब्रह्मीभूत अण्णासाहेब पटवर्धन हे एकदां एका कोर्टांत साक्ष बावयास गेले होते; आणि त्यांची साक्ष झाल्यावर साक्षीभत्ता घेण्याविषयीं जेव्हां त्यांना कोर्टाच्या अधिकाऱ्यांकडून पाचारण झालें, तेव्हां **" मीं खरें बोलण्याबद्दल भत्ता घेत नसतों "** असें म्हणून ते आपल्या घरीं निघून गेले ! व्यवहारांत असे खरे सत्यनिष्ठ सत्पुरुष किती सांपडतील ? वास्तविक असे पुरुष जगांत जर प्रायः कोठेंच दिसत नाहींत, तर मिथ्याव्यवहाराबद्दल कोणी कोणास हंसावें ? **" उडदामाजीं काळें गोरें । काय निवडावें निवडणारें ? "** अशींच जनव्यवहाराची वास्तविक स्थिति असल्यामुळें " कोणीं कोणास हंसूं नये " हेंच खरें; परंतु जगांत नेहमीच " सर्वांनीं सर्वांस हंसावें, " असा प्रकार दृष्टीस पडतो; तेव्हां खऱ्या ज्ञानी पुरुषांना ह्या जगाचा वीट येणें अगदीं साहजिक असल्यामुळेंच **"विविक्त-देशसेवित्वं अरतिर्जनसंसदि"** ( भ. गी. १३–१० ) म्हणजे अरण्यवास आणि दुःसंगत्याग हीं त्यांचीं सहज लक्षणें असतात.

" रोग्याचें प्राणसंकट निवारण करून मिळविलेलें प्राणदानाचें पुण्य शेंदोनशें रुपयांस विकून टाकावयाचें, ह्यापेक्षां मनुष्याचा (वैद्याचा) अधिक नीचपणा काय असणार ? " अशा अर्थाचें आमच्या एका आयुर्वेदिक ग्रंथांत एक वाक्य आहे; आणि केवळ उदरनिर्वाहास अत्यावश्य असलेल्या द्रव्याशिवाय एक पैसाही रोग्याकडून न घेण्याचें ज्या वैद्यशास्त्रनिपुणांचें नित्य व्रत असे, असे कांहीं पुण्य वैद्य ह्या पुण्यांत आम्हीं स्वतः पाहिले आहेत. त्यांचें सर्व अध्ययन फुकट होत असे, म्हणजे त्यांना सर्व विद्यादान बिनखर्चानें प्राप्त होत असे; म्हणून त्यांना धनलोभ नसून केवळ ज्ञानवृद्धि आणि पुण्यसंचय ह्यांच्याकडे त्यांची दृष्टि असे. आणि सांप्रतच्या बेगडी सुधारणेच्या काळांत प्रथम विद्यार्जनासच हजारों रुपये खर्चावे लागत असल्या कारणानें, पुढें धंदा सुरू केल्यावर सहजच द्रव्यार्जनाकडे मुख्य दृष्टि जात असल्यामुळें ज्ञानवृद्धीस मुकावें लागतें. बॅरिस्टर लोकांना तर कायदेशीर रीतीनें आपली फी ( मुशाहिरा ) वसूल करतां येत नसल्या-

मुळें ती आगाऊ घेतल्याशिवाय ते कोर्टांत पायच ठेवीत नाहींत. अशा पंडितांशीं आणि त्यांच्या जगाशीं निर्मम, निरहंकार ज्ञानी पुरुषाचें ( भ. गी. २–७१ ) सूत कसें जमणार ?

**सूत्र ६२ ॥ न तदसिद्धौ लोकव्यवहारो हेयः, किंतु फलत्यागस्तत्साधनं च कार्यमेव ॥**

**आर्या.** ॥ सिद्धावस्थेपूर्वी लौकिककार्यें कदा न सोडावीं ॥
॥ परि कर्मफलत्यागें, साधनसह भक्ति इष्ट साईची ॥

**विवरण.** सामान्य जनांकरितां **" न देवचरितं चरेत् "** असा जो शास्त्रनियम आहे, त्याचें कारण श्रीज्ञानेश्वरांनीं **" जें सायासें स्तन्य सेवी ॥ तें पक्वान्नें केवीं जेवीं ॥ "** असें सांगितलें आहे. त्या नियमानुसार सिद्धावस्था प्राप्त होण्याचे पूर्वी साधकांनीं लोकव्यवहारत्याग म्हणजे अर्थात् सर्व कर्मसंन्यास करूं नये, असें ह्या सूत्रांत प्रथमतः सांगितलें असून नंतर भक्तीला साधनभूत असलेलीं सकल कर्में परमेश्वरार्पणास्तव अवश्य करावीं, असा बोध केलेला आहे.

चतुर्थ सूत्रोक्त मृदुभक्तिलाभ झाला म्हणजे पुरुषाला जी सिद्धावस्था स्वभावतः प्राप्त होते, त्याला कारणीभूत असलेलीं सत्कर्में सिद्धावस्थेपूर्वी सोडिलीं तर, ती अवस्थाच प्राप्त होणार नाहीं, ह्यास्तव वरील बोध केला आहे.

**सूत्र ६३ ॥ स्त्री धन नास्तिकचरित्रं न श्रवणीयम् ॥**

**आर्या.** ॥ स्त्री धन नास्तिक ह्यांच्या, वार्ता कानीं कदां न आणाव्या ॥
॥ दुःसंगचि देती त्या, **साई**—भक्तीस पथ्य हेंचि असे ॥

**विवरण.** सूत्रें त्रेचाळीस ते पंचेचाळीस ह्यांमध्यें दुःसंगाचे भयंकर परिणाम कथन करून त्यांच्या त्यागाची आवश्यकता सांगितली आहे. ह्या सूत्रांत अधिभौतिक मोहास कारण होणाऱ्या कोणत्याही वस्तूचें नुसतें

नांवसुद्धां ऐकूं नये, असा उपदेश केला आहे, मग अशा वस्तूंच्या संगाची गोष्टच नको. जोंपर्यंत दृढ वैराग्योपरमांची प्राप्ति झाली नाहीं, तोंपर्यंत वस्तुगुणवर्णनाचा परिणाम मनावर होऊन त्या वस्तूविषयीं मनांत अगदीं नकळत संकल्प होत असतो ( भ. गी. ३—३६,३७ ). ह्या संकल्पापासून त्या वस्तूविषयीं मनांत कामवासना उद्भवून ती हळू हळू अधिकाधिक दृढ होऊं लागते ( भ. गी. ६—२४ ). आणि शेवटीं हा काम आत्मनाशास कारण होतो (भ. गी. २—६२ व ६३, आणि मागील सूत्र ४४). " **बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपिकर्षति** " म्हणजे

## ( आर्या स्वकृत )

॥ सामर्थ्य इंद्रियांचें, विद्यावंतांसि लोळवी स्वपदीं ॥
॥ ह्यास्तव वैराग्याविण, होई जें ज्ञान तें खरें नोहे ॥

हा सिद्धांत अबाधित ठरून अखेरीस "**बोलणें फोल झालें ॥ डोलणें वाया गेलें ॥** " असा प्रकार झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत, आणि तींही महाशब्दज्ञानी पंडितमन्यांचीं !

॥ धैर्यं यस्य पिता क्षमाच जननी शांतिश्चिरं गेहिनी ॥
॥ सत्यं सूनुरयं दयाच भगिनी भ्राता मनःसंयमः ॥
॥ शय्या भूमितलं दिशोपि वसनं ज्ञानामृतं भोजनम् ॥
॥ एते यस्य कुटुंबिनो वद सखे कस्माद्भयं योगिनः ॥

ह्या **योगी** शब्दाची व्याख्या किती उत्तम आहे ? ज्या सत्वगुणप्रधान प्रकृतीपासून ज्ञानप्राप्ति होते ( भ. गी. १४—१०, १७ ) तिलाच गीतेच्या षोडशाध्यायांत दैवी संपत्ति म्हटलें आहे. ह्या दैवी संपत्तीमध्यें **धैर्य** (अभय) **क्षमा, शांति, सत्य** आणि **दया** ह्या उपर्युक्त श्लोकस्थ पांचहि गुणांचा समावेश होत असून ( भ. गी. १६-१ ते ३ व ७ ) सर्वेंद्रिय संयमरूप वैराग्योपरमही ( सत्वसंशुद्धिर्ज्ञान योगव्यवस्थितिः ) **योग्याला** अवश्य आहेत ( भ. गी. २—२८, ३५, ६१, ६९ । ३-६ ।६-१४, २० २५ व

३५ । ८-१२ । १३-८ । १६-१ आणि ( १८-५२ ) असें सांगून गीतेची उपर्युक्त श्लोकांशी भगवंतांनीं पूर्ण एकात्मता प्रस्थापीत केली आहे.

## सूत्र ६४ ॥ अभिमानदंभादिकं त्याज्यम् ॥

**आर्या.** ॥ अभिमान दंभ आदिक, शत्रु त्यागेंचि लाभतो सांई ॥
॥ त्यांच्या योगें होतो, दु:संगाचाचि संग निज हृदयीं ॥

**विवरण.** अमानित्वादि जीं वीस ज्ञानलक्षणें गीतेंत सांगितलीं आहेत ( भ. गी. १३–७ ते ११), त्या सर्वांच्या विरोधी असलेल्या अज्ञान लक्षणांचा त्याग साधकानें अवश्य करावा, असा बोध ह्या सूत्रांत केला आहे. अर्थात् अमानित्व हें जसें देहाहंकार नष्टतारूप आद्य ज्ञान–चिन्ह आहे, तसेंच मान्यता हें देहाहंकार पूर्णतारूप आद्य म्हणजे सर्वश्रेष्ठ अज्ञान–चिन्ह आहे. अशा देहाहंकार पूर्ण लोकांचें जें स्वभाववर्णन श्रीरामचंद्रांनीं श्री लक्ष्मणापाशीं केलें होतें, तें प्रथम सूत्राच्या विवरणाांत सार्थ दिलेंच आहे. त्याचा विचार केला म्हणजे आत्मज्ञानी पुरुष ह्या जगाला कां कंटाळलेले असतात, तें लक्षांत येईल. असा कंटाळा आल्यामुळेंच श्री नारायण महाराज सुप्यासारखें खेडेगांव सुद्धां सोडून अगदीं निर्जन अरण्यांत (बेटांत) जाऊन राहिले. आणि त्यांच्या प्रारब्धबलानें तेथेंही हवेल्या उठल्या ! ह्या प्रारब्धाला त्यांनीं करावें काय ? ह्यांत कोणाचा दोष असल्यास तो त्यांचा नाहीं. जनतेचा आहे. असो. ज्ञानी पुरुषांच्या वीस सुलक्षणांचें आणि त्यांच्या विरोधी असलेल्या कुलक्षणांचें वर्णन ज्ञानेश्वरींत फारच मार्मिक रीतीनें केलेलें आहे. गीतोपदेशांत अगदीं प्रथमत:च आत्मस्वरूपाचें वर्णन केलें आहे, ( भ. गी. २–११ ते ३० ). पुढें ज्ञानी पुरुष आत्माच हाय. ( भ. गी. ७–१८ ) असें म्हटलें आहे. आणि नंतर ज्ञानी पुरुषांचीं अमानित्वादि लक्षणें सांगितलीं आहेत. ( भ. गी. १३–७ ते ११ ). त्या लक्षणांत प्रस्तुतच्या प्रवृत्ति मार्ग श्रेष्ठता प्रस्तापकांना अननुकूल अशींच जास्त आहेत. आणि इतकें असूनही हे गीतेला परम पूज्य मानून तिच्यामधील ज्ञानलक्षणांना नाकें मुरडतात

## सूत्र ६५ ॥ तदर्पिताखिलाचरः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ॥

**आर्या.** ॥ देहेंद्रियनिर्मित जीं, कर्मे तेवींच मानसिक वृत्ती ॥
॥ कामक्रोधादिक हीं, सकलहि **सांई**प्रतीच अर्पावीं ॥

**विवरण.** एकोणीसाव्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें सर्व लौकिक म्हणजे इहामूत्रफलभोगाच्या साऱ्या कामना सोडून तदनंतर देहेंद्रियांकडून जीं कांहीं कर्मे सहज घडतील, तीं सारीं "**त्यागाय समृतार्थानाम्**" ह्या कालिदासोक्त रघुवंशव्रताप्रमाणें फलांसह श्रीहरीला अर्पण केलीं, म्हणजे सर्व काम भागतें, असें नाहीं; तर मनाच्या कामक्रोधादिक ज्या वृत्ति असतात, त्यांचाही ओघ ईश्वराच्या पदाकडेच वळवावा, असा ह्या सूत्रांत उपदेश केला आहे. अर्थात भक्तियोगसाधकानें आपली सारी चित्तवृत्ति सर्व प्रकारें सर्वदा फक्त ईश्वराकडेच वळविली पाहिजे असा ह्या सूत्राचा तात्पर्यार्थ आहे. कामादि वृत्ति परमेश्वराकडे वळविण्याचा मार्ग असा आहे. **विद्यायां व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनम्**" ह्या भर्तृहरीच्या नीतिशतकोक्तीप्रमाणें "**सांख्ययोग**" नामक भगवद्गीतोक्त द्विविधा ब्रह्मनिष्ठेपैकीं आपल्या स्वभावजकर्मानुसार ( भ. गी. १८–४१ ते ४५ ) लाभलेल्या मार्गाचे ठायीं निष्ठापूर्वक म्हणजे श्रद्धापूर्वक ( भ. गी. ४–३९; १७–१ व २; १८–५० ) अनन्यगतिक होऊन तदेकपरतेनें ईश्वराची पूर्ण कृपा संपादन करण्याचा **काम** मनांत नित्य धरावा, म्हणजे त्याचें **व्यसन** लावून घ्यावें. अर्थात् इतर सर्व व्यसनें त्याज्यच होत. मी एकनिष्ठेनें तुझी अखंड भक्ति करीत असूनहि तूं मजवर कृपा कां करीत नाहींस, अशा प्रकारें ईश्वरावर **क्रोध** करून त्याच्याशीं रुसावें; कारण ईश्वर प्रेममयय आहे, आणि "**प्रेमेवीण रुसूं नये**" असा श्रीसमर्थांचा बोध आहे. अर्थात् अजाण मूल रुसलें म्हणजे माता जशी त्याची लवकर समजूत करते, त्याप्रमाणें आपणावर रुसलेल्या भक्ताचीही ईश्वर लवकर समजूत घालितो. ईश्वराचा कृपाप्रसाद अधिका-

धिक प्राप्त होण्याचा **लोभ** धरावा. ईश्वरभक्तीच्या व्यसनांत दंग होऊन त्या **मोहांतच** नामरूपात्मक दृश्य, मिथ्या, जड जगताची विस्मृति व्हावी. ईश्वर प्रेमापुढें महाराजाधिराजाचीहि कृपा तुच्छ वाटून **मदोन्मत्त** व्हावें. आणि

|| " समर्थाच्या घरचें श्वान || तयासि सर्वहि देती मान ||
|| तैसा तुझा म्हणवितों दीन || हा अपमान कोणाचा || १ ||
|| लक्ष्मी तुझे पायातळीं || आम्हीं भिक्षेसि घेऊनि झोळी ||
|| येणें तुझी ब्रीदावळी || कैशी राहील गोविंदा || २ ||
|| कुबेर तुझा भांडारी || आम्हां फिरविसी दारोदारीं ||
|| ह्यांत पुरुषार्थ मुरारी || काय तुजला पैं आला || ३ ||
|| द्रौपदीसी वस्त्रें अनंता || देत होतासी भाग्यवंता ||
|| आम्हांलागीं कृपणता || कोठून आणिली गोविंदा || ४ ||
|| मावेची करुनी द्रौपदी सती || अन्नें पुरविलीं मध्यरात्रीं ||
|| ऋषेश्वरांच्या बैसवूनि पंक्ति || तृप्त केल्या क्षणमात्रें || ५ ||
|| अन्नासाठीं दाही दिशा || आम्हां फिरविसी जगदीशा ||
|| कृपाळूवा परमपुरुषा || करुणा कैसी तुज नये || ६ ||

इत्यादि प्रकारें भक्तोत्तमांविषयीं आपला **मत्सर** ईश्वराला निवेदन करावा. असें षड्रिपूंचें वळण बदललें, म्हणजे तेच उत्तमोत्तम बांधव होतात. तात्पर्य—देहेंद्रियमनप्राणादिकांच्या सकल वृत्तींचा ओघ सतत ईश्वरच्चरणाकडे ठेवावा, असा ह्या सूत्राचा अर्थ आहे.

कंस—शिशुपालादिकांच्या प्रारब्धयोगानें घडून आलेल्या अखंड चिंतनात्मक विरोधी भक्तीचा प्रकार जरी निराळा असला, तरी तिचें फळ हितकारकच होतें, असेंच पुराणें सांगत आहेत.

**सूत्र ६६ || त्रिरूपभंगपूर्वकं नित्यदास्य नित्यकांताभजनात्मकं प्रेमकार्यं प्रेमैव कार्यम् ||**

**आर्या.** || पूजा पूजक **साई,** या त्रिपुटीला समूळ नाशुनिया ||
|| कांतेसम दासासम, स्वात्मार्पक नित्यभक्ति आदरिजे ||

**विवरण.** भज्य, भजक आणि भजन अशा द्वैतात्मक भिन्नत्वांत जो अहंभाव शिल्लक राहातो तो सर्वात्मैक्याला विरोधी आहे, ह्यास्तव त्याचा त्याग करून जीवेशैक्यरूप पूर्ण अद्वैत भावनेनें आत्मनिवेदन करावें; आणि मग श्रीमारुतिरायाप्रमाणें उपास्याच्या अखंड दास्यभक्तींत अथवा जगन्माता श्रीलक्ष्मीप्रमाणें सतत चरणसेवारूप कांताभजनांत सर्वदा एकात्मतेनें रममाण व्हावें, असा ह्या सूत्रांत उपदेश आहे. "**आत्मबुध्या त्वमेवाहम्**" ह्या सिद्धांताप्रमाणें स्थूल देहभिन्नत्वास्तव अनेकत्व पावलेला **आत्मा** तत्त्वत: अभिन्न एकरूप आहे (भ. गी. १३–२). "**जीवबुध्या त्वदंशकः**" ह्या सिद्धांताप्रमाणें तोच अद्वैतात्मा सूक्ष्मदेहभिन्नत्वास्तव सच्चिदानंदांशभोगी झाल्यामुळें आत्मांशाप्रमाणें भासतो. आणि "**देहबुध्यातु दासोऽहम्**" ह्या सिद्धातांप्रमाणें सर्वथा परतंत्र असलेला देह ईश्वरेच्छाधीनत्वास्तव ईशाचा दास आहे. ह्यास्तव देह ईश्वराच्या म्हणजे सद्गुरूच्या सेवेला अर्पण करून समुद्रांश असलेला लवणपिंड समुद्रांत टाकला म्हणजे जसा आपलें भिन्नत्व टाकून समुद्रात्मकच होतो, त्याप्रमाणें देहद्वयप्राप्त सुखांश सद्गुरुरूपीं अखंडानंदसागरांत टाकून दिला (सद्गुरूचें सुख तेंच माझें सुख अशी भावना केली) म्हणजे जीवबुद्धीचा त्याग होऊन जीवब्रह्मैक्यतेचा लाभ होतो. एका म्यानांत जशा दोन तरवारी राहात नाहींत, त्याचप्रमाणें एका देहांत द्वैतभावना आणि अद्वैतभावना ह्या दोन्हीं कधींही राहणार नाहींत. श्वानसूकरादिकांना देखील प्रत्यक्षत्वास्तव द्वैतभावना सत्य भासते. परंतु जें भासतें तें सत्य आहे किंवा नाहीं, ह्याचा विचार करण्याचा अधिकार मात्र मानवाचा आहे. तो निकाल लावण्यास "**ऐकाग्र्यं परं तपः**" ह्या सिद्धांतांत सांगितलेलें अखंड चित्तैकाग्र्यरूपी तप फार दीर्घकाल आचरावें लागतें. असें तप केवळ वर्षानुवर्षेंच नव्हे, परंतु अनेक जन्मानुजन्म करून (भ. गी. ६–४० ते ४७) ज्यांनीं ब्रह्मात्मैक्याचा **स्वानुभव** संपादन केला, असे अनेक महात्मे ह्या **वेदजनक आर्यावर्तांत** होऊन गेले आहेत, असें आपल्या वसिष्ठ-याज्ञवल्क्यादि संतपरंपरेवरून सिद्ध होत असतां आपल्या अल्पबुद्धीमुळें आणि दीर्घ

तपाभावामुळें तो आत्मानुभव आपल्याला अगम्य आहे, एवढयाच कारणा-स्तव त्याच्यावर मिथ्यात्वाचा आरोप करणें, ह्यांत बुद्धिमत्ता खास नाहीं. बुद्धिमत्तेसंबंधानें बृहस्पति म्हणून गाजलेल्या अद्वितीय विद्वान पुरुषालासुद्धां ज्या असंभवनीय विमानादिकांच्या वर्णनास्तव पुराणें अविश्वसनीय वाटत होतीं, तींच विमानें आतां नित्योपयोगांत आलेलीं आहेत ! अशा प्रकारें नुसत्या आधिभौतिक ज्ञानाविषयींच्या अतिश्रेष्ठ बुद्धिमान् लोकांच्याहि कल्पना केवळ भ्रममूलक व अज्ञानमयच जर ठरत आहेत, तर मनबुद्ध्यादिकांच्या पलीकडे असलेल्या ( भ. गी. ३–३७ ते ४३ ) अतींद्रिय आत्मवस्तूचें ज्ञान सर्वस्वीं इंद्रियाधीन आणि इंद्रियावलंबी असलेल्या क्षुद्र बुद्धीला अगम्य आहे, एवढयाच कारणास्तव त्याच्यावर मिथ्यात्वाचा आरोप करणें, हें नुसतें अनुकंपनीय बुद्धिमांद्यच नव्हे, परंतु अक्षम्य धाष्टर्यही आहे ! !

**सूत्र ६७ ॥ भक्ता एकांतिनो मुख्याः ॥**

**आर्या.** ॥ ईशैकभक्ति आहे, श्रेष्ठ असें मानितो सदा सांई ॥
॥ तदितर भक्ती ग्राह्यचि, जरि नच ती शीघ्रगामिनी होते ॥

**विवरण.** आतां येथून एकंदर सात सूत्रांत श्रेष्ठ भक्तांचें वर्णन केलें आहे. मागील सूत्रें चार ते सहा ह्यांमध्यें भक्तियोग सिद्ध पुरुषांच्या अद्वैत ऐकांतिक भक्तीचें महात्म्य सांगितलें आहे, त्यावरून ह्या सूत्रांत तशा भक्तांना मुख्य भक्त कां म्हटलें आहे, तें सहजच लक्षांत येईल. भक्ति ऐकां-तिक असली म्हणजे ती अव्यभिचारिणी होते; आणि ऐकातिक भक्तानें आपल्या परमात्मरूपी उपास्याचें कोणत्याहि नामरूपानें जरी भजन केलें, तरी त्या योगें त्याच्या उपास्याच्या स्वरूपाची परमात्मता मुळींच बिघडत नाहीं; कारण सारींच नामरूपें कल्पितत्वास्तव मिथ्या असून तीं फक्त अंतःप्रेम व्यक्त करण्याचीं चिन्हें आहेत. हें तत्त्व नुमजून, आम्हांला एकच देव पाहिजे, तो नाहीं म्हणून आमच्या समाजांत तंटे माजत आहेत, अशा वल्गना आपल्याला परोक्षज्ञान गुरुकृपेनें लाभलें आहे, असें समजणारे

**" विठ्ठल गणपति दुजा नाहीं "** हें रहस्य नुसत्या शब्दपांडित्यानें कसें समजणार ?

## सूत्र ६८ ॥ कंठावरोधरोमांचाश्रुभिः परस्परं लपमानाः पावयंति कुलानि पृथिवींच ॥

**आर्या.** ॥ सात्विक भावोत्पत्ती, होऊनि हरिगुण परस्परां कथिती ॥
॥ सकुलहि पृथिवी सारी, **सांई**सम संत पावनचि करिती ॥

**विवरण.** ह्या सूत्राच्या आरंभीं भक्तोत्तमांचे जे शुद्ध सात्विकभाव सांगितले आहेत, ते सारे मिळून आठ आहेत. ते असे ( १ ) **स्तंभ** म्हणजे कंठ दाटून येणे, ( २ ) **स्वेद** म्हणजे अंगास घाम सुटणें, ( ३ ) **रोमांच** म्हणजे अंगावर कांटा येणे, ( ४ ) **स्वरभंग** म्हणजे मुखांतून शब्दोच्चार अस्पष्ट होणें, ( ५ ) **वेपथुः** म्हणजे शरीरास कंप सुटणें, ( ६ ) **वैवर्ण्य** म्हणजे मुखकांति बदलणें, ( ७ ) **अश्रु** म्हणजे नेत्रांतून जलबिंदुप्रवाह निघणें, आणि ( ८ ) **प्रलय** म्हणजे मूर्च्छा येणें. हे सारेच भाव एकदम प्रकट होतात असें नाहीं. ते प्रकृतिधर्मावर आणि मनोधर्मावर अवलंबून असतात. ते जसे आनंदजन्य असतात तसेच दुःखजन्यहि असतात. **प्रलय** म्हणून जो अष्टमभाव आहे, त्याचा डोळ्यापुढें अंधेरी येणें, असाहि एक अल्प प्रकार आहे. भक्तांच्या आनंदजन्य सात्विक भावांचे भ. गी. ९, १३ व १४) व अर्जुनाच्या दुःखजन्य सात्त्विक भावांचें (भ. गी. १–२८ ते ३०) भगवद्गीतेंत वर्णन आहे. बहुत सात्विक भक्तांना ह्या भावांचा नेहमीं अनुभव येतो; आणि कांहीं दांभिक भक्त नक्राश्रुद्वारा आपल्या श्रोत्यांना फसविण्याच्या कामांत पुष्कळच वाकबगार झालेले असतात, हेंही आहे.

ह्या सूत्राच्या उत्तरार्धाचा अर्थ शब्दशः करावयाचा नाहीं, फक्त त्याचा भावार्थ ग्रहण करावयाचा आहे, कारण श्रीनारदांसारख्या दिव्य महात्म्यांच्या प्रत्यक्ष परिचयाचे दुरात्मेहि होतेच. त्याचा भावार्थ असा आहे कीं, श्रद्धायुक्त अंतःकरणानें शास्त्रोक्त साधनद्वारा स्वतःच्या प्रयत्नानें सिद्धावस्था म्हणजे कर्मातीतता प्राप्त करून घेतल्यानंतर जे मुमुक्षु महात्म्या

जीवन्मुक्तांना शरण जातात, त्यांचा ते अवश्य उद्धार करितात. " सर्वभूत-हिते रताः " (भ. गी. १२–४ ) ह्या भगवदुक्तीचाहि असाच अर्थ आहे. " जुन्या ग्रीक संतांचीं वाग्पुष्पें " अशा अर्थाच्या नांवाचें एक पुस्तक सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं वाचनांत आलें होतें, त्यांतील एक वाक्य असें होतें:—**"जें काम आपल्या इतकेंच उत्तम रीतीनें इतरांनाही करितां येईल, तें आपण कधींही करूं नये.** " संतांचेंही व्रत प्रायःअसेंच असतें; आणि ह्याच कारणास्तव त्यांची **प्रवृत्ति** फक्त मोक्षदानाकडे असते, कारण कितीहि व्यवहारचतुर पुरुष असला, तरी तो प्रायः मोक्षमार्गांत कवडीमोलच ठरणार. प्रापंचिक कार्यांत सारें जग सदाच दंग असतें. तीं कार्यें करणारांची उणीव जगास कधींही भासणार नाहीं. आणि अशा कोटय-वधी लोकांच्याकडूनही जें मोक्षदानाचें कार्य होणें शक्य नाहीं, तें ज्या महात्म्याला करितां येतें, त्याची ज्या मुमुक्षूला जरूर असेल तो त्याच्याकडे जाईल, अशा समजुतीनें सर्व महात्मे प्रायः जनसंसर्गापासून अगदीं दूर अरण्यांत राहतात; आणि म्हणूनच असें राहणें ( भ. गी. १३–१० ) हें त्याचें एक लक्षण आहे, असा भगवद्गीतेचा नगारा वाजत आहे. अशा महात्म्यांच्या कानावर दुर्जनांची कोल्हेकुई प्रायः जातच नाहीं; आणि तो कदाचित गेली तरी ते " **हाती चलत चालसे अपने ॥ कुतरा भोंकत वाकुं भुंकवा दे ॥ तू तो राम सुमर जग लरवादे ॥** " ह्या कबीरोक्तीप्रमाणें तिच्याविषयीं उदासीन राहून म्हणजे तिची उपेक्षा करून आपल्या भजनानंदांत निमग्न असतात. कारण " **मान दंभ चेष्टा ॥ हें तो शूकराची विष्टा ॥** " ह्या श्री तुकारामोक्तीप्रमाणेंच त्यांची दृढ समजूत झालेली असते !

**सूत्र ६९ ॥ तीर्थी कुर्वंति तीर्थानि, सुकर्मी कुर्वंति कर्माणि, सच्छास्त्री कुर्वंति शास्त्राणि ॥**

**आर्या.** ॥ तीर्थांतें तीर्थपणा, तैसा कर्मांसिही सुकर्मपणा ॥
॥ शास्त्रां सच्छास्त्रपणा, श्री**साई** देतसे स्वसामर्थ्यें ॥

**विवरण.** व्यवहारामध्यें जसा महत्संगाशिवाय महत्वलाभ होत नाहीं, तसाच परमार्थांतहि होत नाहीं. सामान्य पुरुषांपैकीं ज्याला राजकृपालाभ होतो, त्याचें महत्व वाढून त्याच्यापेक्षां श्रेष्ठ अधिकाराचे पुरुषही मागें पड-तात. सामान्य पुरुषाच्या कन्येला राजाश्रय मिळाला कीं ती राणी होऊन तिच्यापेक्षां शतपट अधिक रूपगुणसंपन्न असलेल्या मुली आपल्या सामान्य पूर्वस्थितींतच असतात. सामान्य पुरुषाचा पुत्र राज्यावर बसला कीं त्याचें वैभव अनंत पटींनें वाढतें. हा प्रारब्धाचा खेळ किती विचित्र आहे ? ह्याच न्यायानें सकल क्षेत्रें हीं केवळ महात्म्यांचीं स्मारकें होत. श्री ज्ञानेश्वरांच्या-मुळें आळंदीला क्षेत्रत्व लाभलें. श्रीतुकाराम महाराजांच्यामुळें देहू क्षेत्र बनलें. कांहीं पुराणप्रसिद्ध नसलेल्या नद्यादिकांना संतसंगानें तीर्थत्व प्राप्त झाल्याचीं उदाहरणेंही आहेतच. विवाहसंस्थेचा आद्य जनक जो श्वेतकेतु त्याच्या पुण्याईनें त्या विधीस विश्ववंद्यत्वाचा लाभ झाला आहे. सत्पुरुषांचा आचार हा श्रेष्ठ धर्म होय, अशी धर्माची व्याख्या श्री व्यासांनीं विष्णुसहस्रनामांत केली आहे, ह्यावरून सत्पुरुषाश्रयामुळेंच धर्मशास्त्राला प्रामाण्य लाभलें, असें ठरतें. **"पितुर्माता गरीयसी"** ह्या वेदवचनास सुद्धां भारता-दिकांच्या आचारावरून अपवाद प्रस्थापित झाला. सारांश जडाला चैतन्या-श्रयाशिवाय महत्त्व येणें शक्य नाहीं, ह्या अनुभवसिद्ध तत्त्वानुसार विचार केला तर जड द्रव्याश्रित विद्यासाधनांनीं आधिभौतिक ज्ञान कितीही वाढ-वितां आलें, तरी त्यांच्यायोगें आध्यात्मिक ज्ञानप्राप्ति यत्किंचितही होणें शक्य नाहीं, असें कबूल करणें न्यायतःच प्राप्त होतें. ह्यास्तव जडद्रव्य त्यागमूलक बुद्धीनें चित्तैकाग्र्यरूपतपद्वारा ज्या महात्म्यानें आत्मज्ञानप्राप्ति करून घेतली आहे त्याचा प्रसाद झाल्याशिवाय आत्मलाभ होणें शक्य नाहीं. जोडा शिवण्याची विद्या संपादन करावयची असल्यासही तज्ञ गुरूची अवश्यकता आहे. मुंबईचे सुप्रसिद्ध वकील प. वा. रावसाहेब किर्लोस्कर ह्यांना वादनकला संपादन करण्यासाठीं एका प्रख्यात तबलजीची अनेक वर्षें सेवायुक्त मनधरणी करावी लागली, तेव्हां ते त्या कलेंत प्रवीण झाले; सकल विद्यामध्यें श्रेष्ठ असून केवल अनुभव गम्य गुह्यतम

असलेली अतींद्रिय अध्यात्मविद्या मात्र ( भ. गी. ३-४२, १०–३२ ) उकिरडयांत लोळत पडली असून झारेकऱ्यालाहि लाभते, असें समजणारे जे असतील त्यांच्यासंबंधानें **"ते कं न जानीमहे"** असें म्हटल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. वास्तविक विचार केला तर त्रेसष्ठाव्या सूत्राच्या शेवटीं सांगितलेल्या सत्वप्रधान दैवीसंपत्तीनें अर्जुन हा पूर्णपणें अधिष्ठित असल्याकारणानें ( भ. गी. १६-५ ) तो स्वभावतः साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी होता, म्हणूनच त्याला भगवंतांनीं पूर्णवैराग्यमूलक ( भ. गी. २-४५ ) **अध्यात्मोपदेश** ( भ. गी. ११-१ ) केला. नाहीं तर तो कधींही केला नसता. परंतु **आधिभौतिकवासनापूर्ण** वैराग्यशून्य अनधिकारी पुरुषाचे प्रस्तुत कालीं अध्यात्मज्ञानाचे स्वयंभ महामहोपाध्ये बनूं लागले आहेत; मग तें उकिरडा फुंकणारांच्याही वाटयास येतें, ह्यांत नवल काय ?

**सूत्र ७० ॥ यतस्तन्मयाः ॥**

**आर्या.** ॥ स्वयमेवचि सच्छास्त्रें, आणि सुकर्में तशींच तीं तीर्थें ॥
॥ असती संत सकल त, ह्यास्तव पालन असेचि मम **साई** ॥

**विवरण.** जीवब्रह्मैक्यभावपूर्ण ज्ञानी अथवा जीवेशैक्यभावपूर्ण योगी अशा महात्म्यांनीं ज्या वस्तूवर आपल्या मान्यतेचा शिक्का मारिला, ती प्रायः सर्वमान्य व्हावी यांत नवल नाहीं. ? त्यांनीं स्वीकारलेली वस्तु सहजच तन्मय होऊन जाते. म्हणजे दोहोंचें पूर्ण ऐक्य होतें. ह्या अद्वैत शास्त्रांतील तत्त्वें केवळ इंद्रियजन्यज्ञानावलंबी लोकांना प्रायः गूढच राहिलीं आहेत. तथापि जोपर्यंत मनुष्य सर्वज्ञ झाला नाहीं, तोपर्यंत आपल्यापेक्षां कमी विचारवान नसलेल्या मनुष्याच्या अनुभवजन्य ज्ञानाला मिथ्या म्हणण्याचा त्याला न्यायतः मुळींच अधिकार नसतो.

**सूत्र ७१ ॥ मोदंते पितरो नृत्यंति देवताः सनाथा चेयं भूर्भवति. ॥**

**आर्या.** ॥ पितृलोक मुदित होई, नृत्य करिति देवताहि निजलोकीं ॥
॥ निष्कंटकत्व लाभे, पृथिवीसी **सांईच्या** प्रभुत्वानें ॥

**विवरण.** ह्या सूत्राच्या पूर्वार्धाच्या विवरणाचें काम आमच्या कल्पनाशक्तीच्याही पलीकडचें आहे, कारण पितृलोक आणि देवलोक ह्यांची अतींद्रिय ज्ञानाभावीं आम्हीं कल्पना तरी करावी कशी ? ह्यास्तव वरील आर्येच्या पूर्वार्धांत जो शब्दार्थ आला आहे, तेवढयावरच समाधान मानून सूत्राच्या तृतीय विधानाचा आतां विचार करूं. श्री महाविष्णूशीं तादात्म्य पावलेले पूर्णाद्वैतज्ञानी महात्मे संत जोंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर वसत आहेत, तोंपर्यंत " **नाविष्णुः पृथ्वीपतिः** " ह्या शास्त्रसिद्धांतान्वयें ती सनाथ असणारच. पृथ्वीला **विष्णुपत्नी** ही संज्ञा आहे. अर्थात् अनंत सच्चिदानंदमय श्रीमहाविष्णुनामक परब्रह्माशीं ब्रह्मज्ञानद्वारा एकात्मता न पावलेला कोणताहि स्वतः परब्रह्मभिन्न असलेला **अविष्णु** जीव पृथ्वीपति नाहीं, हें निश्चित आहे. विष्णु पत्नी पृथ्वी ही अशा सकल जिवांची माता होय; आणि याच कारणास्तव प्रत्येक मनुष्यानें प्रातःकालीं निजून उठल्यावरोबर भूमीवर (पृथ्वीवर) पाय ठेवण्यापूर्वी " **विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे** " असें म्हणून तिच्यावर पाय ठेवण्याबद्दल तिची क्षमा मागितली पाहिजे, अशी शास्त्राज्ञा आहे. नराधिपांना नरपति असेंहि म्हणतात. परंतु नरपति ह्या शब्दाचा जसा नरपाल असाच अर्थ समजावयाचा असतो, तद्वत भूपति ह्या शब्दाचाहि अर्थ भूपाल म्हणजे लोकपाल असाच केला पाहिजे.

**सूत्र ७२. ॥ नास्तितेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादि भेदः ॥**

**आर्या.** ॥ जाती-स्वरूप-विद्या-कुल-धन-कर्में विभक्ति जी करिती ॥
॥ मानव कल्पित सारी, **सांई**—भक्तां न ती कदा शिवते ॥

**विवरण.** सत्कर्मयोगद्वारा म्हणजे ऐकांतिक भक्तीच्या योगें ज्ञानप्राप्ति होऊन गुणातीत म्हणजे कर्मातीत झालेले जे स्थितप्रज्ञ म्हणजे जीवन्मुक्त परमहंस पुरुष क्वचित दृष्टीस पडतात, त्यांना शास्त्रांत अतिवर्णाश्रमी म्हटलेलें आहे. त्यांचा प्रस्तुत सूत्रोक्त सकल आधिभौतिक उपाधि भेदांचा सहज-न्यास झालेला असतो. द्वैतमूलक सकल व्यावहारिक भेदभावना पूर्णत्वें

नष्ट झाल्याशिवाय सत्यमूर्ति अद्वैत ज्ञानलाभ होणें शक्य नाहीं. तो होण्याच्या पूर्वी केलेली आत्मज्ञानाची " **क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.** " अशा वाचाळ पुरुषांना "**तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ?**" अशी थोबाडींत मिळण्याचे अनेक प्रसंग सहजच येतात, कारण त्यांच्या कृतींत आणि उक्तींत सुसंगति प्रायः क्वचितच असते. ह्या सत्यमूर्ति सुसंगतेच्या दैवीपणास्तव "॥ **बोले तैसा चाले ॥ त्याचीं वंदावीं पाउलें** ॥". अशा प्रकारें तिची दैवी संपत्तिमान् पुरुषांकडून पूजा होते; आणि तिलाच कांहीं असुरेंद्र **रासभगुणही** ( Virtue of an ass ) म्हणतात. तेव्हां दैवी संपत्तीच्या पुरुषांना अशा प्रकारच्या असत्यप्रिय असलेल्या अखिल असुरचमूचा आत्यंतिक किळस येऊन ते जर अरण्यवास बरा म्हणूं लागले, तर त्यांत आश्चर्य काय ? प्रपंचवासना निर्मूळ झाल्यानंतरही कांहीं पुरुष ह्या असत्यप्रिय जनसंगांतच आपलें आयुष्य कंठीत असतात, त्याचें कारण त्यांचें अपरिहार्य प्रारब्धच होय ! त्यांचें पूर्वजन्मार्जित पातक पूर्णत्वें नष्ट झालें नसतें, म्हणूनच त्यांना तत्फलभूत दुःसंग निमूटपणें सहन करावा लागतो ! !

**सूत्र ७३ ॥ यतस्तदीयाः ॥**

**आर्या**. ॥ संतां हरिरूपत्वें, लाभें सर्वात्मकत्व नित्यत्वें ॥
॥ मानवनिर्मित भेदां, **सांई**–पायीं नसे कदां थारा ॥

**विवरण**–वरील आर्येंत प्रस्तुत सूत्राचा अर्थ स्पष्ट केला आहे, ह्यास्तव अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. सदसष्टाव्या सूत्रांत आरंभिलेला विषय येथें संपला. आतां पुढील दोन सूत्रांत भक्तांनीं वादविवादाच्या भानगडींत पडूं नये, असा सकारण उपदेश केला आहे.

**सूत्र ७४ ॥ वादो नावलंब्यः ॥**

**आर्या**. मिथ्याभिमान धरिती, वाद तयांसीं असे अनिष्ट पुरा ॥
॥ **सांई**–योग–प्राप्ती, ऐशा वादें अशक्य होत असे ॥

**विवरण**—श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं सर्वोपनिषदोक्त अद्वैत वेदांत शास्त्रविरोधी असलेल्या सर्व मतांचें खंडन करून दिग्विजय केला, तरी त्यांच्या पश्चात् पुनः अनेक अन्य मतें प्रस्थापित झालींच; आणि असाच प्रकार पृथ्वीप्रलयापर्यंत चालणार. ज्याची न्यायतः सरशी होईल त्याचें गुरुत्व मान्य करणाऱ्या प्रामाणिक जनांचा तो काल होता, म्हणूनच त्यांना तरी दिग्विजय करितां आला. तसा काल त्यांच्यामागें आजपर्यंत आला नाहीं, याचें कारण तेव्हांपासून कोणासच सत्याची चाड राहिली नाहीं, हेंच होय. आणि ह्यापुढेंही तसा काल येण्याची संभवता दिसत नाहीं. प्रस्तुत काल दुरभिमानी भ्याड लोकांचा आहे, असा प्रत्यक्षानुभव आलेला आहे. आखाड्यांत उतरून सामना करण्यास तयार असलेले धर्मवीर आचार्यांच्या मागें आजपर्यंत झाले नाहींत. तेव्हांपासून सारेच धर्मप्रस्थापक भागूबाई-सारखे आडून गोळ्या मारणारे झाले आहेत. अर्थात् अशा भ्याड लोकांना "**नायमात्मा बलहीनेन लभ्यः**" ह्या श्रुत्वन्वयें आत्मज्ञानप्राप्ति होणें अशक्य आहे. ही स्थिति मनांत आणली म्हणजे ह्या सूत्रांतील उपदेशाची तथ्यता उत्तम प्रकारें लक्षांत येते. पूर्ण श्रद्धावान मुमुक्षूची शंकानिवृत्ति करून त्याची समजूत घालणें, हें कार्य प्रस्तुत सूत्रोक्त "**वाद**" ह्या शब्दांत येत नसून ते आवश्यक आहे. परंतु शास्त्रोक्त साधनविहीन स्वमताभिमानी पुरुषांचे कुतर्क जगाच्या अंतापर्यंत अबाधित राहणारच, ह्यास्तव वितंडवादापासून अलिप्त राहावें, असा ह्या सूत्राचा गर्भितार्थ आहे. प्रत्येक शंकेचें समाधान झालें, म्हणजे तीं शंकासमाधानें लिहून काढून मग दुसऱ्या शंकेचा विचार करून तिचा पूर्ववत् निकाल लावावयाचा; आणि असें सकल शंकांचें समाधान होई-पर्यंत तोच क्रम सुरू ठेऊन अखेर निकाल करावयाचा, ही वाद शब्दाची शास्त्रोक्त व्याख्या आहे. तिचा अंगिकार कोणता असत्यप्रिय पुरुष करणार ? कारण तिच्या मुळाशीं जयापजयाची इच्छा नसून फक्त सत्यान्वेषणाची इच्छा असते. ह्याचसाठीं "**वादे वादे जायते तत्त्वबोधः**" अशी एक कव्युक्ति (सुभाषित) आहे. जयापजयाची इच्छा धरून अन्यमतखंडनार्थ आणि स्वमतप्रस्थापनार्थ जें भाषण होतें त्याला **जल्प** म्हणतात.

हा अभिमानमूलक असल्याकारणानें प्राय: शुद्धसत्यहविहिन असतो. आणि जयापजयाची इच्छा धरून स्वमत प्रस्थापन न करितां नुसतें परमतखंडन मात्र ज्या भाषणांत होतें, त्याला **वितंडा** ( वितंडवाद ) अशी संज्ञा आहे. अर्थात् असें भाषण निष्फळ होय, कारण त्याच्यायोगें कोणताच सिद्धांत प्रस्थापित होत नाहीं. परंतु सांप्रतच्या उच्चारस्वातंत्र्याच्या आणि लेखन-स्वातंत्र्याच्या कालांत नुसतें आपलें घोडें ढकलण्याचा एक नवीनच प्रकार रूढ झाला आहे, तो मात्र आमच्या शास्त्रकारांना मुद्रणकलाभावामुळें परिचित नव्हता, असें दिसतें; आणि ह्या मुद्रणकलानिर्मित नूतन प्रकारानें अनेक दूषित मतांचा प्रसार होऊन समाजाच्या ज्ञानाबरोबर अज्ञानाचीही वाढ होत आहे, ह्यास्तव "**गप्प बसायला काय घेशील**" असें म्हणण्याचे दिवस आले आहेत! कायद्याच्यामुळें अनेक अपराधी लोक सुटले तरी हरकत नाहीं, परंतु एकाही निरपराधी मनुष्याला शिक्षा होतां कामाची नाहीं, असें जें एका कायद्याचें तत्त्व आहे, तदनुरोधानें विचार केला तर असें म्हणावें लागतें कीं, ज्ञानप्राप्ति न झाली तरी चालेल, परंतु ही अज्ञानवृद्धि नको!! पातकें प्रथमत: बंद झालीं पाहिजेत, आणि त्यानंतर वाटेल तर पुण्यें करावीं, अशी आमच्या शास्त्रांची योजना होती, पण तो काळ गेला!!

**सूत्र ७५ ॥ बाहुल्यावकाशाद् नियतत्वाच्च ॥**

**आर्या-** ॥ वाद सुयंत्रित नोहे, यास्तव त्याचा न होत अंत कदा ॥
॥ कालक्षेप निरर्थक, जेणें विघ्नेंचि येती **सांइ**—पदा ॥

**विवरण-** सूत्रार्थ आर्येत स्पष्ट झाला आहे; आणि मागील सूत्राच्या विवरणापेक्षां अधिक विस्ताराचें प्रयोजन नाहीं.

**सूत्र ७६ ॥ भक्ति शास्त्राणि मननीयानि तदुद्बोधकरकर्माणि करणीयानि ॥**

**आर्या-**॥ भक्तीच्या शास्त्रांचें, मनन तसें कर्महि तदनुरोधें ॥
॥ आचरण्याचा निश्चय, केल्या पावेचि भक्त साइपदा ॥

# गुरुप्रसाद

## अथवा

# विश्वामित्राचें अस्त्रदान

आपणासारीखे करिती तात्काळ
नाहीं काळ वेळ मग त्यांसी ॥ १ ॥

—तुकाराम

मनुष्यप्राणी आपलें इष्ट साध्य साधण्याकरितां स्वकल्पनेनें नाना तऱ्हेच्या साधनांचा उपयोग करून पाहातो. पण त्या साधनांनीं इष्ट साध्य साधत नाहींसें दिसलें म्हणजे तो दुसऱ्याचा सल्ला घेतो. अर्थात तो ज्याचा सल्ला घेतो तो त्याचा गुरु होतो. पण जें साध्य त्याला साधावयाचें असतें त्या साध्याचा तो गुरु पूर्ण माहितगार व अनुभवी असला तरच त्याचें साध्य सत्वर साधतें; नाहीं तर स्वतःचा प्रयत्न फसण्याच्या दुःखापेक्षां त्याला त्या गुरूपदेशापासून झालेल्या हानीचें दुप्पट दुःख होतें. याकरितां असें साध्य साधण्यासाठीं जो गुरु करावयाचा तो तज्ज्ञ असून पूर्ण अनुभवी असावा. समर्थ म्हणतात, 'जो कोणी ज्ञान बोधी ॥ समूळ अविद्या छेदी ॥ इंद्रिय दमन प्रतिपादी ॥ तोचि सद्गुरु जाणावा ' ( दा. ५।२।२२ ) पण सद्गुरु असा असून विचारणारा ( शिष्य ) हा विश्वासु व दृढनिश्चयी नसला तर त्याला साध्य प्राप्त करून घेतां येत नाहीं. समर्थ म्हणतात,

"...गुरु पूर्ण कृपा करी ॥ परि शिष्य अनधिकारी ॥
भाग्य पुरुषाचा भिकारी ॥ पुत्र जैसा " ( दा. ५।३।५ )

याकरितां गुरु ज्ञानवान,अनुभवी असला तर त्याला शिष्यही सदाचारी, दृढनिश्चयी मिळाला पाहिजे. अशी जोडी जेव्हां मिळते तेव्हां 'म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य ॥ तेथें न लगती सायास ॥ त्या उभयतांचा हव्यास ॥ पुरे एकसरा ' असें समर्थ म्हणतात. ( दा. ५।३।७ ) आणि अशीच जोडी एकत्र मिळाली म्हणजे 'आपणासारीखे करिती तात्काळ ।

नाहीं काळ वेळ मग त्यांसी ' असें संतशिरोमणि तुकाराम महाराज म्हणतात.

समर्थ म्हणतात त्या उभयतांचा म्हणजे गुरुशिष्यांचा हव्यास पुरतो. तर त्यांत गुरूचा हव्यास कोणता असेल? अशी कित्येक शंका घेतात. त्याचें उत्तर असें आहे कीं, आपलें इष्ट साध्य साधलें पाहिजे ही जशी सच्छिष्यास उत्कट इच्छा असते व तो त्याकरितां सद्गुरूचा शोध करितो त्याप्रमाणें सद्गुरूही आपणास प्राप्त झालेलें ज्ञानबीज सच्छिष्याचे ठिकाणीं पेरावें अशी उत्कट इच्छा धरितात. कारण देह नश्वर असल्यामुळें तो केव्हां तरी जाणारच आणि आपण संपादन केलेलें ज्ञान जर दुसऱ्यास दिलें नाहीं तर तें आपल्याबरोबर तसेंच जाणार हें योग्य नाहीं; कारण ' आपण यथेष्ट जेवणें ॥ उरलेलें अन्न वाटणें ॥ परंतु वाया दवडणें ॥ हा धर्म नव्हे ॥ १ ॥ तैसें ज्ञानें तृप्त व्हावें ॥ तेंचि ज्ञान जनांसि सांगावें ॥ तरतेन बुडों नेदावें ॥ बुडतयासी ॥ २ ॥ आणि त्याकरितां ' उत्तम गुण स्वयें घ्यावे ॥ तें बहुतांस सांगावें ॥ वर्तल्या वीण बोलावें ॥ ते शब्द मिथ्या' ॥ ३ ॥ असें दासबोधांत सांगितलें (दा. १२।१०) आहे. यावरून स्वतः ज्ञान संपादन करून त्याचा अनुभव घ्यावा व नंतर तें दुसऱ्यास सांगावें; पण जागच्या जागीं मुरूं देऊं नये, अशी समर्थांची शिकवणूक आहे. अर्थात् तें ज्ञान एखाद्या सच्छिष्यास सांगावें व त्याकरितां आपणास सच्छिष्य मिळावा असा त्यांचा हव्यास असतो. आणि त्याकरितां ते जागच्या जागींच त्याचा शोध करितात व शोध लागल्यावर ते त्या शिष्यास आपलेजवळ बोलावून घेतात. ' जसे शिर्डीचे साईनाथ यांनीं नानासाहेब चांदोरकर यांना एक वेळ बोलाविलें, असें कैलासवासी आप्पा कुळकर्णी यास सांगितलें होतें.' अथवा शेतकऱ्याच्या उदाहरणानें ' शेतकरी जर शाळेंत जाऊं शकत नसेल तर शाळेनें शेतकऱ्याच्या झोंपडींत गेलें पाहिजे. ' ह्या स्वामि विवेकानंदांच्या विचारसरणीप्रमाणें गुरु स्वतः सच्छिष्याच्या शोधार्थ जात असतात. त्याप्रमाणें विश्वामित्र मुनि हे स्वतः श्रीरामाकडे गेले होते.

ज्या वेळेस परकीय राक्षसी राजसत्तेचा अंमल हिंदुस्थानांत बळजबरीनें ठिकठिकाणीं सुरू होऊन आर्यांना त्रास झाला होता, त्या वेळेस विश्वामित्र मुनि सिद्धाश्रमांत आले असतां त्यांना मारीच, सुबाहु व ताटिका ह्यांच्या धुमाकुळीनें कामाश्रम, मलद व करूष हे देश उजाड होऊन सिद्धाश्रमास त्यांचा फार उपद्रव होतो असें त्यांना समजलें.

विश्वामित्र मुनि हे पूर्वीचे क्षत्रिय असून त्यांना शस्त्रास्त्रांची चांगली माहिती होती. त्यांना त्या राक्षसांचा समाचार घ्यावयाचा होता. कारण अगस्त्यादि ऋषींनीं राक्षसांच्या त्रासापासून आपापले आश्रम मुक्त करून घेतले होते. पण विश्वामित्र मुनि ब्राह्मण झाल्यावर त्यांनीं शस्त्रसन्यास घेऊन क्रोधवश कार्य करण्याचें सोडून देऊन शांतीचा अवलंब केला होता. म्हणून राक्षसांच्या धुमाकुळीचें वर्तमान ऐकून स्वतःही त्यांचा अनुभव घेतला, तेव्हां त्यांनीं त्यांच्या नाशाच्या उपाययोजनेकडे आपलें चित्त लाविलें. ते मनांत म्हणाले, आपण आपली शांति बिघडवून राक्षसांचा वध करूं नये, परंतु आपणास शस्त्रास्त्रांची माहिती आहे. तरी एखाद्या तरूण क्षत्रियाला शिकवून त्याचेकडून या राक्षसांचा संहार करवून हा सिद्धाश्रम ऋषि लोकांना सुखावह करून द्यावा. पण या राक्षसांशीं धैर्यानें टक्कर देणारा कोण सांपडणार, असा ते विचार करूं लागले. तितक्यांत त्यांना आठवलें कीं, " विष्णुना सदृशोवीर्यें सोमवत्प्रियदर्शनः ॥ कालाग्निसदृशः क्रोधे क्षमया पृथिवी समः" ( वा. रा. १।१।१८ ) असा दशरथाचा पुत्र श्रीराम आहे. त्यालाच घेऊन येऊन आपल्याजवळ असलेल्या अस्त्रांचें शिक्षण द्यावें व त्याचेकडून आर्यांना त्रास देणाऱ्या परकीयांचा नायनाट करावा, असा विचार करून ते अयोध्येस गेले व दशरथाजवळ श्रीरामाबद्दल त्यांनीं मागणी केली.

श्रीरामचंद्र वसिष्ठाजवळ धनुर्विद्या शिकले होते, परंतु बलाढ्य व मायावी राक्षसांशीं टक्कर देण्याजोगें त्यांना अस्त्रज्ञान नव्हतें. म्हणून

'ऊनं द्विदशवर्षोऽयमकृतास्त्रश्चराघवः,' असें सांगून श्रीरामाला न देण्याचा आपला विचार दशरथानें विश्वामित्रास कळविला. परंतु ह्या राजाचा विचार चांगला नाहीं, या विचारानें राजा श्रीरामाचें नुकसान करीत आहे असें जाणून वसिष्ठमुनी म्हणाले,'राजा श्रीरामाला अस्त्रांची माहिती जरी नाहीं तरी तूं कांहीं काळजी करूं नको. श्रीरामाजवळ अस्त्र असो वा नसो तो विश्वामित्राचे आश्रयाला असला म्हणजे राक्षस श्रीरामाचें तेज सहन करूं शकणार नाहींत, कारण एषोऽस्त्रान्वि विधा न्वेत्तित्रैलोक्ये सचराचरे ॥ नैन्य मन्यः पुमान्वेत्ति नच वेत्स्यन्ति केचन ॥ ११ ॥ नदेवानर्षयःके चिन्नामरा नच राक्षसः ॥ गंधर्व यक्ष प्रलराः सकिन्नर महोरगाः ॥ १२ ॥ ( वा. रा. १।२१ )

अर्थ--नाना प्रकारच्या शस्त्रांचें ह्याला ज्ञान आहे; ह्याच्यासारखें अस्त्रज्ञान चराचर त्रैलोक्यामध्यें कोणालाही नाहीं व पुढेंही ऋषि,अमर, राक्षस, श्रेष्ठ गंधर्व आणि यक्ष, किन्नर व मोठमोठे नाग लोक ह्यांपैकीं कोणाला प्राप्त होण्याचा संभव नाहीं. ( ११-१२ ) अर्थात श्रीराम जर ह्यांचे सहवासांत असले तर हा त्याना उत्तम अस्त्राचें ज्ञान देईल. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी सांगितल्या तेव्हा दशरथानें श्रीराम-लक्ष्मणाला विश्वामित्राचे स्वाधीन केलें. तेव्हां विश्वामित्र आनंदानें त्या दोघांना घेऊन निघाला. पण हे राजपुत्र उन्हांत, पाण्यांत लांबच्या प्रवासांत कधीं निघाले नाहींत आणि माझ्याबरोबर तर ह्यांना लांबचा प्रवास आणि तोही पायीं करावा लागेल; अर्थात हे थकून जातील, उन्हानें घाबरतील व निरनिराळ्या ठिकाणचें पाणी लागून यांची प्रकृति विघडेल म्हणून यांची प्रकृति निकोप राहील अशी योजना केली पाहिजे.

* क. स. बालकांड सर्ग २० मध्यें 'ऊन षोडषवर्षोमे रामो राजीव लोचनः,' म्हटलें आहे ( श्लो. २ ) यांत श्रीराम १५ वर्षांचा आहे असें म्हटलें व याच ग्रंथाच्या अरण्यकांडांतील सर्ग ३६ श्लोक ६ मध्यें 'ऊनद्वादशवर्षोऽय प्रकृतास्त्रश्चराघवः' असें म्हटलें; पण ह्या श्लोकांतील वयमानावरून श्रीरामाच्या खऱ्या वयाचा निश्चय होऊं शकत नाहीं. म्हणून ऊनद्वादश हा लेक प्रसादाने ऊनद्विदशाचा ऊनद्वादश असा शब्द पडला असावा असें वाटून विश्वामित्रमुनि अयोध्येस आले. ह्यावेळेस रामाचें वय १९ वर्षांचें होतें, हें आम्ही आपल्या यथार्थरामायणांत सिद्ध केलें आहे. ( हें रामायण छापलें नाहीं. )

असा विचार करून पहिल्याच मुक्कामास शरयूच्या दक्षिण तीरावर त्यांनीं श्रीराम-लक्ष्मणाला बलातिबला * विद्या सांगितली. फार लांबचा प्रवास झाला नाहीं तोंच विश्वामित्राला श्रीरामाची चिंता पडली. किती ही शिष्याचे प्रकृतीची गुरूला काळजी ! नाहीं तर शिष्यानें मरेपर्यंत गुरूची सेवा करावी पण गुरूनें त्यां कांहीं खाल्लें किंवा नाहीं हेंही फुकट विचारूं नये; असे कित्येक गुरु असतात. परंतु तुकाराममहाराज म्हणतात असे गुरु कुचकामाचे असतात. गुरु तोच उत्तम होय कीं 'शिष्याची जो नेघे सेवा ॥ मानी देवासारिखे ॥ १ ॥ आणि असा गुरु असला तरच 'त्याचा फळे उपदेश' व जो असें वागत नाहीं केवळ शिष्यानें माझी सेवाच करावी अशी इच्छा ठेवतो त्या-बद्दल 'आणिका दोष उफराटे' असा तो शेरा मारतो. हें माझें बोलणें न रुचून कित्येक गुरु रागावतील तर त्यांसाठीं 'तुका म्हणे सत्य सांगे ॥ येती रागें येती ते.' असें निर्भीडपणानें ते म्हणतात ( तु. गा. २४९९ ) असो. याप्रमाणें शिष्यांचे प्रकृतीची काळजी घेऊन ते सुखी होतील अशी विश्वामित्रानें योजना केली; पण त्यांना अस्त्रदान केलें नाहीं; कारण उत्तम शिक्षक विद्यार्थ्यांची परीक्षा घेतल्याशिवाय त्याला श्रेष्ठ विषयाचें शिक्षण देत नाहीं. या नियमाप्रमाणें श्रीराम हा वसिष्ठाचे तालमींत

---

* बलातिबला ह्या वनस्पति आहेत. बला याला मराठींत चिकणा हें नांव आहे. हें झाड सुमारें हात दीडहात उंच वाढतें. याचीं पानें आकारानें तुळशीच्या पानासारखीं असतात. याचीं फुलें पिवळीं असून त्यास बारिक बोंडें येतात. त्यांत बीं असतें ( पदे कृ. वृ. नि. ल. ८६ ) अतिबला-मुद्रिकेचें झाड. हें पुरुषभर उंच असतें. याचीं फुलें पिवळीं असून याला चक्राकार फळें येतात, त्यांत वळवीजाप्रमाणें बीं असतें ( प. कृ. वृ. वि. नं. ८८ ) विश्वामित्र म्हणतात, यांचे सेवनानें मार्गांत चालण्याचे श्रम होत नाहींत व झोंपी गेलेल्या मनुष्याला थोडी चाहुल लागली कीं तो तावडतोब जागा होतो म्हणूनच " सुप्तं प्रमत्तं वा धर्षयिष्यन्ति नैर्ऋताः " ( वा. रा. १।२२।१३ ) म्हणजे ' तूं निद्रिस्थ असतां अथवा असावध असतांनाही हिंदुस्थानचे नैर्ऋत्येस रहाणारे अनार्य अर्थात राक्षस तुला धरूं शकणार नाहींत ! याप्रमाणें या वनस्पतीसंबंधीं ' मंत्रग्राम' (मंत्रसंग्रह ) शिकून घे असें म्हणून त्यानें ती विद्या त्यांना दिली.

तयार झालेला होता व त्याची शौर्यधैर्यादि गुणांची कीर्ति ऐकिली होती. तरी प्रत्यक्ष परीक्षा घेऊन नंतर त्याला अस्त्रदान करावें असें वाटून या वेळेस त्यानें श्रीरामाला अस्त्रदान केलें नसावें. पुढें तो परीक्षा घेण्याचा प्रसंग लवकरच आला. ताटिकेनें उध्वस्त केलेल्या काम्यक वनांतून निघाल्यावर मलद व करुष हे दोन देश ओलांडून विश्वामित्र ताटिकेच्या भयंकर वनांत आला. तेथें आल्यावर जिनें वरील देश उध्वस्त केले ती ताटिका या वनांत रहाते तिचा तूं वध कर, असें त्यानें श्रीरामाला सांगितलें. श्रीरामानें ती आज्ञा ऐकून धनुष्याचा टण-त्कार करून ताटिकेला या रानांत कोणीतरी क्षत्रिय आल्याची त्यानें सूचना केली. त्या सूचनेप्रमाणें ती रामाचे अंगावर चालून आल्यावर 'स्त्री वधः सर्व घातकः' ह्या वचनाप्रमाणें बालशिक्षण मिळाल्यामुळें तिची दया येऊन जरी प्रथम तिला जिवंत ठेवण्याचा श्रीरामानें प्रयत्न केला तरी ती त्या दयेला झुगारून देऊं लागली; तेव्हां विश्वामित्राच्या ओजस्वी शिक्षणानें क्षणार्धांत त्यानें तिचा वध केला. त्या ताटिकेच्या वधावरून श्रीरामाच्या अंगीं जरी फाजील दया वसत आहे, तरी धैर्य, पराक्रम व कार्य करण्याची तत्परता हे गुण अलौकिक आहेत असें त्याला आढळून आलें, तेव्हां अशा राजपुत्रास आपणास अवगत असलेल्या सर्वास्त्रांचें दान करून आपण कृतार्थ व्हावें असा विचार करून त्यानें मग विलंब न लावतां अवगत असलेल्या सर्वास्त्रांचें + दान श्री-

+ युद्ध करण्याचीं साधनें दोन. १ शस्त्र व २ रें अस्त्र. हातीं धरून मारण्याच्या साधनास शस्त्र म्हणतात. जसें, तलवार, पट्टा, खांडा ( खड्ग ) गदा वगैरे, व फेंकून मारण्याच्या किंवा कांहीं भाग हातीं व कांहीं भाग वातावरणांत सोडणाऱ्या साधनास अस्त्र म्हणतात. जसें धनुष्यबाण, बंदुक, तोफ, शक्ति वगैरे. तरी सर्वच बाणांस अस्त्र ही संज्ञा नव्हती व सर्व गदांस शस्त्र ही संज्ञा नव्हती. ज्या बाणाला विशेष आकार दिला जात असे त्याला अस्त्र म्हणत. उदाहरणार्थ—ज्या बाणावर सूर्यासारखें चित्र असे त्याला सूर्यास्त्र, सर्पाकृति बाणाला नागास्त्र, दर्भाप्रमाणें बारीक बाणाला ईषिकास्त्र इत्यादि. त्याच-प्रमाणें कांहीं प्रसिद्ध पुरुषानें परिणामकारक केलेल्या बाणांसही अस्त्र म्हणत, जसें मनूनें तयार केलेल्या बाणांस मानवास्त्र, इंद्रास्त्र, वायवास्त्र, अग्न्यास्त्र, पाशुपतास्त्र वगैरे—या अस्त्रांचाही परिणाम शस्त्रासारखाच होतो, ( पहावा व. रा. ६।६७।६८ )

रामाला केलें. वसिष्ठाच्या सांगण्यावरून विश्वामित्राजवळ अस्त्रसंग्रह चांगला आहे असें श्रीरामास समजलें होतें. तरी मला अस्त्रांची माहिती द्या अशी त्या मानी श्रीरामानें कधीं याचना केली नाहीं; कारण त्याला आत्मविश्वास इतका होता कीं, आपल्या गुणानें गुरूची आज्ञा परिपालन करून त्याची कृपा संपादन केली तर आपणांस गुरूचा प्रसाद मिळणारच आहे. त्याप्रमाणें वागून म्हणजे राजपुत्र असूनही त्या वैभवाचा अभिमान न धरितां गुरूप्रमाणें अरण्यांतील शीतोष्णादि द्वंद्वांचा आनंदानें स्वीकार करून व गुरूच्या आज्ञेप्रमाणें ताटिकेचा वध करून क्षात्रधर्माची परीक्षा दिली; तेव्हां याचना केल्यावांचून गुरूनें आपले जवळचीं सर्व अस्त्रें × श्रीरामास देऊन आपणासारखें त्याला सामर्थ्यवान केलें. गुरुकृपेनें प्रसाद मिळाल्यावर शिष्याला स्वहिताचे प्रश्न विचारण्याची सहज प्रवृत्ति होते. त्याप्रमाणें विश्वामित्रानें अस्त्रदान केल्यावर श्रीरामाला वाटलें कीं, हीं अस्त्रें बाळगून तीं सोडलीं असतां संपून जातील; मग पुढें आपणाजवळ शिल्लक कांहीं रहाणार नाहीं; याजकरितां तीं अस्त्रें सतत कशीं कायम रहातील हें शिकून घ्यावें असा विचार करून श्रीराम म्हणाले, "गृहीतास्त्रोऽस्मिभगवन्दुराधर्षः सुरैरपि ॥ अस्त्राणांत्वहमिच्छामिसंहारान्मुनि पुंगव" (वा. रा. १।२८)

अर्थ–हे भगवान् मी अस्त्रांचा स्वीकार केला आहे व त्यामुळें मी आतां देवांनाही अजिंक्य झालों; परंतु हे मुनि, श्रेष्ठ अस्त्रांचा उपसंहार कसा करावा हें जाणण्याची मला इच्छा आहे. असें विचारल्याबरोबर विश्वामित्रास आनंद झाला. त्याला वाटलें कीं, शिष्य चतुर आहे. याप्रमाणें शिष्याचा भक्ति व चतुराई पाहून त्यानें अस्त्रोपसंहार शिकवून त्याला आपलेप्रमाणें दुर्धर्ष केलें. सारांश गुरु उत्तम प्रकारचा ज्ञानी असून शिष्य श्रद्धाळु, निष्कपट व कोणतेंही कार्य करण्यांत दक्ष असा असला तर गुरु त्याला 'आपणासारीखे करिती तात्काळ ॥ नाहीं काळवेळ मग त्यासी' असें संत तुकाराम महाराज म्हणतात. याजकरितां शिष्यास न लाविती साधन ॥ न करविती इंद्रियदमन ॥ ऐसे गुरु

× अस्त्रांचीं नांवें मुळांतून वाचावीं.

अडक्याचे तीन ॥ मिळाले तरी त्यजावे ॥ दा. ५।२।२१॥ या समर्थांच्या वचनाप्रमाणें परीक्षा करून गुरु करावा. ' शिष्य पाहिजे युक्तिवंत ॥ शिष्य पाहिजे बुद्धिवंत ॥ शिष्य पाहिजे संतासंत ॥ विचार घेता ॥ दा ५।२।२७ ॥ याप्रमाणें आपली योग्यता करून घेऊन आपण गुरु-प्रसादास योग्य आहों अशी पात्रता गुरूचे निदर्शनास आणून देऊन

पद

सद्गुरु सेवन करमन भाई ॥ नाथ निरंजन सांइ गुसाई ॥ ध्रु० ॥
शीलधिवासी सगुणरूपधारी ॥ भक्तजनेदित मन भयहारी ॥ १ ॥
सांइ धरे कर शिरपर जाके ॥ गुरुता बंधन तूट जलाके ॥ २ ॥
साइ कृपा विन पान न हाले ॥ सत्यव्रजकर आनंद डोले ॥ ३ ॥

असा नित्य मनाला बोध करून ' आला भागासी तो करी-व्यवसाय ॥ परी राहो भाव तुझेठाई ॥ ' या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें कर्तव्याला जागृत राहून सद्गुरु साई नाथाची प्रार्थना केली असतां सद्गुरु ' आपणा सारीखे करीती तात्काळ ॥ म्हणून ज्याप्रमाणें श्रीरामानें स्वकर्तव्य करून गुरुप्रसाद संपादन केला त्या प्रमाणेंच भारतवासियानें कर्तव्यास जागृत राहून श्री सांईनाथ कृपा संपादन करावी. इतकें सांगून लेखणीस रजा देतों.

ॐ तत्सत्

स्वामी कृष्णानंद

माहपा. पूर्वाश्रमीचे कृष्ण जोगेश्वर भीष्म-

अवघे ज्याचे सिद्ध तो ॥ ९३ ॥ संकल्प अथवा विकल्पासी । जागा न मुळींच ज्यापाशीं । मी तूं या भावनेशीं । न जाणें तो सिद्ध ॥९४॥ देहाची न ज्यांना क्षिति । जे मीच ब्रह्म ऐसें लेखिती । सुख-दुःखाचा अभाव चित्तीं । ज्यांच्या असे ते सिद्ध ॥ ९५ ॥ ह्या ज्या मी कथिल्या स्थिती चार । ह्याचा करी पूर्ण विचार । हें जें दिसतें चराचर । तें स्वरूप ईश्वराचें ॥ ९६ ॥ ईश्वर आहे अवघ्या ठायीं । त्याविण रिता ठाव नाहीं । परि मायेनें ठकविलें पाही । उमगूं न दे त्या ईश्वरा ॥ ९७ ॥ मीं तूं आणि माधव सत्य । तैसा मारुती पंढरीनाथ । ह्माळसापती काशीनाथ । आडकर साठे हरीपंत ॥ ९८॥ काका तात्या गणेशबेरे । तैशीच वेणू पक्षा रे । भागचंदादि लोक सारे । आहेत अंश प्रभूचे ॥ ९९ ॥ म्हणून कोणी कोणाचा । द्वेष करूं नये साचा । अवघ्या ठिकाणीं ईश्वराचा । वास हें विसरूं नये ॥ १०० ॥ ह्मणजे अंगीं निर्वैरता । आपोआप निपजे तत्वतां । निर्वैरतेचा उदय होतां । साधेल अवघें हळू हळू ॥ १०१ ॥ चित्त जाण मानवाचें । आहे उच्छृंखल साचें । तें स्थीर करण्याचे । प्रयत्न केले पाहिजेत ॥ १०२ ॥ जैसी मक्षिका अवघ्यावर । बैसे पैं वैश्वानर । पाहतां फिरे सत्वर । तेथूनियां माघारी ॥ १०३ ॥ तैसेंच हें रंगेल मन । सर्वाठायीं रमे पूर्ण । परि एक ब्रह्म पाहून । तोंड आपुलें फिरवीतसे ॥ १०४ ॥ ऐसें हें ओढाळ मन । ब्रह्मीं न झाल्या संलग्न । जन्ममरण यात्रा जाण । नाहीं चुकणार नारा-यणा ॥ १०५ ॥ ती तों चुकविली पाहिजे आधीं । येऊनियां नर जन्मामधीं । या जन्मापरि संधी । नाहीं दुसरी अमोलिक ॥ १०६॥ ह्मणूनी मन करण्या स्थिर । हा मूर्तिपूजेचा प्रकार ॥ मूर्तींतही पर-मेश्वर ॥ नाहीं परी ती करावी ॥ १०७ ॥ मूर्तिपूजा भावें करितां । चित्ताची होय एकाग्रता । एकाग्रतेविण तत्वतां । नये स्थिरत्व

मनासी ॥१०८॥ पुढें करावें मनन ध्यान । अध्यात्म ग्रंथावलोकन । तैसें वागण्याचा आपण । प्रयत्न करावा निश्चयें ॥ १०९ ॥ सर्व विद्येंत प्रधान । ही आत्मविद्या जाण । दिवौकसीं पंचवदन । वा पर्वतीं मेरु जैसा ॥ ११० ॥ आत्मविद्या साधिल्यावरी । मुक्ति चालून येते घरीं । बंदा गुलाम श्रीहरी । होतो त्याचा अंकित ॥ १११ ॥ ही अध्यात्मविद्येची पायरी । तुम्हां अवघड चढण्या जरी । परि सुलभ युक्ति खरी । सांगतों मोक्षा जावया ॥ ११२ ॥ तूं मारुती हरीपंत । बेरे काका तात्यादि भक्त । यांनीं अनुसरणें हीच रीत । मोक्षालागीं जावया ॥ ११३ ॥ मागें तुला आणि निर्वाण-करा । ज्या कथिलें ज्ञानभांडारा । तैसें वागून परमेश्वरा । शरण जावें अवघ्यांनीं ११४ ॥ नित्य घ्यावें सिद्ध दर्शन । नीति जागृत ठेवून । या पुण्येंकरून । अंतसमयीं राहेल शुद्धी ॥ ११५ ॥ मात्र तया अंतसमयीं । आस कोणाची करूं नाहीं । मन एकाग्र लव-लाहीं । करून प्रभू आठवावा ॥ ११६ ॥ जें आपलें आराध्य दैवत । त्याचें करावें ध्यान सत्य । त्या ध्यानांत घडतां अंत । समीपता मुक्ति मिळेल ॥ ११७ ॥ जैसी नुकतीच गेली बन्नू । बोधगांवात सुलक्षणू । तैसेच अडकर आणि वेणू । मुक्त होतील आत्मज्ञानें ॥ ११८ ॥ ऐसें बोलून अभयहस्त । ठेविला चांदोरकर-शिरीं सत्य । धन्य महाराज साईनाथ । नमन माझें तयासी ॥११९॥ ऐसी नीति चांदोरकरांनीं । ऐकून द्वय जोडिले पाणी । लीन होऊन साईचरणीं । बोलूं लागले सद्भावें ॥ १२० ॥ हे परब्रह्ममूर्ते गुण-गंभीरा । हे महासिद्धा करुणाकरा । मायबापा परम उदारा । भवनदीचा तारू तूं ॥ १२१ ॥ होऊन आम्हां अज्ञजनांसी । नेलेस पैलतटासी । सांगून दिव्य ज्ञानासी : ऐसीच कृपा असों दे ॥१२२॥ तईं म्हणती साईनाथ । तुम्ही अवघे माझे भक्त । मी न विसरें

तुह्मांप्रत । नका करूं काळजी ॥ १२३ ॥ अल्ला इलाही श्रीराम । देईल तुह्मां सौख्यधाम । पुरवील तुमचे कोड काम । वचन माझें प्रमाण हें ॥ १२४ ॥ सीतावेदरे आण चित्तीं । ही बाबांची थोर महती । चाल त्यांच्या दर्शनाप्रती । वंदन करूं पायांचें ॥ १२५ ॥ त्यांच्या भक्तांच्या खेटराची । सरीही न ये आपणां साची । परी बाबा माय अनाथांची । तारण आपुलें करील ॥ १२६ ॥ आज बाबांचे जमले भक्त । चांदोरकरादि हरीपंत । बाबांनीं आपुल्या भक्तांप्रत । केली आहे मेजवानी ॥ १२७ ॥ ज्ञानवैराग्य आणि भक्ती । हींच पक्वान्नें निश्चितीं । करून आपल्या भक्तांप्रती । जेवा ह्मणती यथेच्छ ॥ १२८ ॥ जें जें रुचेल जयाशीं । तें तें त्याणें सेवणें ऐसी । ताकीद आपुल्या भक्तांसी । बाबा करिती चाल सिते ॥१२९॥ आपण उभयतां कुत्र्यापरी । त्या समर्थाच्या राहूं द्वारीं । एखादा तो तुकडा तरी । फेंकील आपणांकडे गे ॥ १३० ॥ तोच पुरेल आपणांशीं । कृतार्थ वेडे करण्याशीं । चाल पर्वणी पुन्हां ऐशी । नाहीं कधीं येणार ॥ १३१ ॥ शताश्वमेधाचें पुण्य । येथेंच मिळेल तुह्मां लागून । या अध्याया केल्या पठन । एक वेळही श्रोते हो ॥१३२॥ ही साईची अध्यायत्रयी । सरस्वती गंगा यमुना पाही । हेंच प्रयाग सांगूं काई । भावार्थांत बुडी घ्या ॥ १३३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत । वदलों यथामती सत्य । हे तारक भक्तांप्रत । होवो ह्मणे दासगणू ॥ १३४ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

## इति त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः

302

# श्री संतकथामृत

३६

श्री दासगणूकृत

## अध्याय ५७ वा

श्री गणेशायनमः ॥ हे चित्स्वरूप लंबोदरा । आद्यमूर्ती उदारा । धरून सत्वर माझ्या करा । ग्रंथलेखन करवावें ॥ १ ॥ ऐका श्रोते समस्त । हा संतकथामृत नामें ग्रंथ । साक्षाद्‌तु वसंत । संतकथा या आम्रतरू ॥ २ ॥ चमत्कार फांद्या सोज्वळ । पद्यरचना पर्णें कोमळ । बोधरूपी आलें फळ । तें सेविण्या कोकिळ व्हा ॥ ३ ॥ हा ग्रंथ मानस सरोवर । पद्यरचना हेंच नीर । संतकथा कमलें थोर । या कांसारीं विकासलीं ॥ ४ ॥ बोधरूपी मकरंद । या कमळीं असे शुद्ध । तो सेविण्यासी मिलिंद । व्हा हो तुम्ही अवघे ॥ ५ ॥ मागें भक्तलीलामृत ग्रंथांत । जे मी वर्णिले साईनाथ । एकतीस बत्तिस तेहतिसांत । शिर्डी ग्रामीं वास ज्यांचा ॥ ६ ॥ तो भक्तांचा कल्पतरू । तो भवार्णवीचा होय तारू । महा उदार दया-सागरू भक्तवत्सल ज्ञाननिधी ॥ ७ ॥ त्या समर्थांचे दर्शनासी । पातले तद्भक्त शिर्डीसी । धन संक्रमणीं पौषमासीं । उत्तम पर्व लक्षू-निया ॥ ८ ॥ येथें शंका येईल मनीं । कीं धन संक्रांतमकराहूनी । श्रेष्ठ नसतां पर्वणी । कां हे भक्त मिळाले ॥ ९ ॥ परी पहा धन-संक्रांती । येतां जन सुप्रभातीं । नैवेद्य दाऊन सूर्याप्रती । प्रभातीं करिती भोजनें ॥ १० ॥ तोच प्रकार येथींचा । असे जाणा श्रोते साचा । उलगडा करून तयाचा । सांगतों तुम्हा कारणें ॥ ११ ॥ अनु-तापरूपी वाजली थंडी । भावरूप घालून बंडी । आले भक्त तांतडी । सद्‌गुरूसी भेटावया ॥ १२ ॥ शिर्डी उदयगिरी थोर । साई महाराज हा दिनकर । तेथें उदेला निर्धार । म्हणून भक्त मिळाले ॥ १३ ॥ साईकृपा ही प्रभात । श्रद्धारूप गंगेंत । स्नानें करून अवघे भक्त । गेले साई दर्शना ॥ १४ ॥ तो समर्थांनीं मांडलें पान । भक्तांसीं द्याया

भोजन। करूनियां पक्वान्न। उत्तम आत्मज्ञानाचें ॥ १५ ॥ हाचि तेथींचा धनुर्मास म्हणून या पर्वणीस। भोजनाची करून आस। आले भक्त धांवोनिया ॥ १६ ॥ गोविंदात्मज नारायण। धीर उदार सज्जन। चांदोरकुलीं जन्म जाण। झाला जयाचा कल्याणीं ॥ १७ ॥ तो आणि हरिपंत। महाकर्मठ शुचिर्भूत। वेद मार्गी अत्यंत। निष्ठा असे जयांची ॥ १८ ॥ बेरे नाना निमोणकर। लक्ष्मण मारुती इतर। भक्त जमले थोर थोर। किती म्हणून सांगावें ॥ १९ ॥ अवघे बसले मशिदीसी। हर्ष अत्यंत मानसी। जैसें पाहून जननीसीं। आनंदती लेंकुरें ॥ २० ॥ तें म्हणती चांदोरकर। जोडून आपुले दोन्हीं कर। गा सकट त्रिवार। प्रश्न आम्हीं केला तुम्हां ॥ २१ ॥ त्याचें न दिधलें उत्तर। कां राग आमचेवर। आज सांगा परमेश्वर। कोण कैसा कोठें असे ॥ २२ ॥ महाराज म्हणती त्यावरी। नाना राग न माझ्या अंतरीं। तुम्ही माझीं मुलें सारीं। मी कोपूं कोणावर ॥ २३ ॥ मीं स्थान तुम्हां रूसण्यातें। श्री व्यंकुशहा जरी असते। तरी मशीं स्थान होतें। तुम्हासारिखें रुसावया ॥ २४ ॥ असो मागें तुम्हांलागून। म्यां जे अध्याय कथिले दोन। त्यांचें आधीं करून स्मरण। अवधान द्यावें मव्दोला ॥ २५ ॥ नाना त्या द्वय अध्यायीं। जें मी ज्ञान कथिलें पाही। तें सेविल्या अंगीं येई। साधन चतुष्टयसंपन्नता ॥ २६ ॥ साधन चतुष्टयसंपन्न। जेव्हां होतो शिष्य जाण। तेव्हांच कथावें ब्रह्मज्ञान। उद्धार त्याचा व्हावया ॥ २७ ॥ सिद्धवस्तु साधावया। ज्या ज्या योजिती उपाया। त्याचें नांव ये ठायां। साधन ऐसें जाणिजे ॥ २८ ॥ तीं साधनें आहेत चार। नामें ऐक क्रमवार। चित्त करूनियां स्थिर। आहे विषय गहन हा ॥ २९ ॥ नित्यानित्य वस्तु विवेक। दुसरें तें वैराग्यदेख। तिसरें शमदमादि षटक। चौथें जाण मुमुक्षुता ॥ ३० ॥ नित्यानित्यवस्तु विवेकाची। व्याख्या ऐक आतां साची। पाहिजे भावना मनींची।

कीं ब्रह्मसत्य जगमिथ्या ॥ ३१ ॥ नित्यानित्य वस्तु विवेक। बाणलें मनीं हें दावण्या देख। नाना खटपटी दांभिक। करूनि जना भोंदिती ॥ ३२ ॥ कोणी होऊन वारकरी। खेपा घालिती पंढरपुरीं। परी एकही न जाणे हरि। कोण कैसा कोठे असे ॥ ३३ ॥ तीही न वारी श्रद्धायुक्त। केवळ मान मिळावा जगतांत। हाच हेतु असे सत्य। त्या वारीच्या मुळाशीं ॥ ३४ ॥ नानाग्रंथ भाराभर। करूनियां पाठांतर। परी स्वतांचें न शुद्ध अंतर। उपदेश मात्र करिती परा ॥ ३५ ॥ ते ज्ञानरूपी सरोवरांत। दर्दुरजाण निश्चित। वादरूपी चिखलाप्रत। सेवून टाकिती मकरंदा ॥ ३६ ॥ परनिंदा ज्याचे मुखीं। आपलीच मिरविती शेखी। ते न जाणावे विवेकी। अयोग्य ब्रह्म ज्ञानातें ॥ ३७ ॥ इहपरलोकींच्याविषयाची। आशा न ज्यास उरली साची। तीच मूर्ति वैराग्याची। नाना जाण निश्चयें ॥ ३८ ॥ शम दम तितिक्षा उपरती। श्रद्धा समाधान यां प्रती। शमादी षटक बोलती। ज्ञाते पुरुष चांदोरकरा ॥ ३९ ॥ मनोनिग्रह विषयां ठायीं। याचें नांव शम पाही। ऐक दमाची व्याख्याही। सावधान चित्तानें ॥ ४० ॥ विषयीं गेलिया वासना। बलात्कारें आवरिती मना। त्या आवरण्यापनी नाना। दम ऐसें म्हणावें ॥ ४१ ॥ निज प्रारब्धें करून। प्राप्त झालिया दुःख जाण। तें आक्रोशा वांचून। सहन करणें ती तितिक्षा ॥ ४२ ॥ मायाजाळीं न गुंते चित्त। कनक कांता सुत आप्त। हें मानणें मिथ्या भूत। याचें नांव उपरती ॥ ४३ ॥ विश्वास युक्त असणें मन। याचेंच नांव श्रद्धा जाण। आतां राहिलें समाधान। त्याचें विवरण ऐकावें ॥ ४४ ॥ समान सुख दुःखें मानी सारीं। तळमळ मुळीं न अंतरीं। स्थिर चित्त शैलापरी। याचें नांव समाधान ॥ ४५ ॥ मनीं मोक्ष इच्छा बळकट। त्या व्यतिरिक्त मानी वीट। अपरोक्ष ज्ञानाची जो वाट। हुडकीतसे तो मुमुक्षु ॥ ४६ ॥ मुमुक्षुपणाची पात्रता। अंगीं असणें तत्वतां। याचें नांव मुमुक्षुता ॥

निश्चयें करून जाणावें ॥ ४७ ॥ आतां मोक्ष म्हणजे न वैकुंठ । मोक्ष म्हणजे न कैलासपेठ । आहे फार अवघड वाट । चांदोरकरा या मोक्षाची ॥ ४८ ॥ जगाचें जें आदिकारण । जें अविनाश शुद्ध चैतन्य । त्या वस्तूसी तादात्म्य होणें । याचें नांव मोक्ष पहा ॥ ४९ ॥ त्या अविनाश मोक्ष पदासी । जाणें हाचि पुरुषासी । पुरुषार्थ नाना निश्चयेसीं त्यावीण अवघें वोखटें ॥५०॥ ऐसी ऐकितां समर्थवाणी । चांदोरकर जोडोनि पाणी । बोलते झाले लीन वचनीं । तें शुद्ध चैतन्य कैसें असे ॥ ५१ ॥ जें जगाचें जगदाधार । जें व्यापून उरलें चराचर । ज्याचेंच ठायीं अखेर । लय होणार जगताचा ॥५२॥ ऐसें जें का आद्यमूळ । तेंच चैतन्य सोज्वळ । जगत जें दिसतें निवळ । तो भास जाण नारायणा ॥ ५३ ॥ तें चैतन्य आहे ऐसें । हा निश्चय ना करवत असे । मात्र क्षण क्षणा येत असे । साक्ष असणेपणाची ॥ ५४ ॥ जेथें न व्यापक चैतन्य । ऐसें न मुळी जगीं स्थान । एकही वस्तु त्यावीण । गवसे न शोधूं गेलिया ॥ ५५ ॥ वस्तु निर्देश होण्यासी । चैतन्य मात्र म्हणावें त्यासी । बाकी वत्सा तयासी । नाम रूप कांहीं नसे ॥ ५६ ॥ जैसा कां हा प्रभंजन । रंग रूपातीत जाण । तैसेंच आहे चैतन्य । हें कदाही विसरूं नको ॥ ५७ ॥ त्या चैतन्या ब्रह्म म्हणती । तदोपासना ज्ञाते करिती । ऐशा उपासका या जगतीं । ब्रह्मवेत्ते म्हणतात ॥ ५८ ॥ वृक्ष कोटी प्राणी कोटी । जीव कोटी जंतु कोटी । एक चैतन्याच्या पोटीं । अवघे जाण सामावे ॥ ५९ ॥ दृश्य ज्ञेय भासमान । या अवघ्यासी आद्यकारण । नाना एक चैतन्य । किती सांगू तुजप्रती ॥ ६० ॥ तें चैतन्य सर्व व्यापक चैतन्य क्लेश रहित देख । तें सत्यज्ञानरूप एक । आनंदरूप तेंच कीं ॥ ६१ ॥ हे अवघे आपण । त्यापासून नाहींत भिन्न । त्या चैतन्या लागून । ब्रह्म ऐसें म्हणावें ॥ ६२ ॥ तें चांदोरकर जोडून हात । म्हणती हे सद्गुरूनाथ । ब्रह्म सर्वव्यापक

क्लेश रहित। आनंदरूप एक म्हणतां ॥ ६३ ॥ आणि तेंच ब्रह्म-सर्वांठायीं। नटलें म्हणतां माझे आई। येथे मजला शंका येई। त्याचें करा निरसन ॥ ६४ ॥ जग अवघें क्लेश युक्त। तैसेंच आहे अनंत। चैतन्याचे गुण त्यांत। कांहीं न येती प्रत्यया ॥ ६५ ॥ जो अंध जन्मापासून। तो कैसा पाहिल लावण्य। तैसें सत्य चैतन्य। मिथ्यामाजीं राहे कसें ॥ ६६ ॥ आत्माच चैतन्य लेखितां। तदैकत्व गुरूनाथा। नष्ट होईल सर्वथा। कां कीं आत्मे अनेक ॥ ६७ ॥ आत्म्याचें सुखदुःखभान। न होय अन्योन्या लागून। मग अवघ्यांत एक चैतन्य। आहे कैसें म्हणावें ॥ ६८ ॥ जैसीं शरीरें भिन्न भिन्न। तैसेच आत्मे भिन्न भिन्न। आत्मा चैतन्यापासून। वाटे असावा निराळा ॥ ६९ ॥ तैं म्हणती साईनाथ। चुकतोस तूं नाना येथ। आतां करून स्वस्थ चित्त। अवधान द्यावें मब्दोला ॥ ७० ॥ पहा ताम्र शुभ्र काळा। मिश्र रंग निळा पिंवळा। किरमिजी हिरवा जांभुळा। पृथक् टाकिले पाण्यांत ॥ ७१ ॥ मग त्याचे भरून पेले। ठेविले वेग वेगळाले। म्हणून कां होतें निराळें। उदक वेड्या ते ठायीं ॥ ७२ ॥ ताम्रसंगें ताम्र जाण। बैसलें ताम्र होऊन। पिंव-ळ्यासंगें पीलपण। आलें नाना उदकासी ॥ ७३ ॥ मग तें घेऊन मिश्रण। केलिया त्याचें पृथक्करण। पिंवळेंपण हिरवेंपण। नष्ट होईल उदकाचें ॥ ७४ ॥ तैसें आत्माहृदयं होतां एक। प्रतीतीस येती सुखदुःख। हृदयें मात्र अनेक। आहेत नाना मानवांचीं ॥७५॥ परी आत्म्याचा न भेद तेथ। तो अवघ्यांचा एकची एक सत्य। सुखदुःखेंहीं तो खचित। आहे धर्म हृदयाचा ॥ ७६ ॥ परी हृदयास येण्या हृदयपण। आहे आत्म्याची अपेक्षा जाण। आत्मा तोच चैतन्य। वोळख वत्सा तयासी ॥ ७७ ॥ आतां नाना तुमची। करावया समज साची। फोड करून या विषयाची। सांगतों तें ऐकावें ॥ ७८ ॥ चैतन्य आहे त्रिगुणात्मक। पारमार्थिक व्यवहा-

रिक । आणिक पहा प्रतिभासिक । हे वत्सा नारायण ॥ ७९ ॥ जैसा एकचि देहजाण । भोगितो अवस्था तीन । वृद्ध तारूण्य बाळपण । तोचि प्रकार येथींचा ॥ ८० ॥ पारमार्थिक चैतन्याची । ज्या आत्म्या आली साची । योग्यता नाना तयाची । होत गणना साधूंत ॥ ८१ ॥ जे सशास्त्र करिती वर्तन । त्याज्या त्याज्य जाणून । त्या आत्म्यालागून । व्यावहारिक म्हणावें ॥ ८ ॥ जे असत्या सत्य मानिती । जे अज्ञानपटलें झांकले असती । नाना ऐशा आत्म्याप्रती । प्रतिभासिक म्हणावें ॥ ८३ ॥ प्रतिभासिक तें अज्ञान । व्यावहारिक ते सज्जन । पारमार्थिक ते संत जाण । परि आत्माचि कारण अवघ्यांसी ॥ ८४ ॥ पहा राजा, अधिकारी, राजदूत । या अवघ्यातिघांप्रत । कारण राजसत्ता सत्य । परि भिन्नत्व तिघा ठायीं ॥ ८५ ॥ राजास बसावया सिंहासन । गज पालखी नाना यान । राजा स्वइच्छे करून । अवघ्यांलागीं वागवितो ॥ ८६ ॥ राजाज्ञेस अनुसरून । अधिकारीवर्ग वर्ते जाण । त्यांच्या इच्छेस अवलंबून । राहावें लागतें राजावरी ॥ ८७ ॥ बजावणी राजाज्ञेची । राजदूत करिती साची । परि त्यांच्या इच्छेची । गती येथें कुंठित ॥ ८८ ॥ राजसत्तेच्या आवरणांत । ही वागते अवघी रयत । परी कारण अवघ्यांप्रत । आहे एक राजसत्ता ॥ ८९ ॥ राजेपण सचीवपण । दूतपण रयतपण । हें अवघें अवलंबून । आहे राजसत्तेवरी ॥ ९० ॥ राजा अधिकारी राजदूत । तैसीच ही अवघी रयत । या सर्वांपासून खचित । आहे भिन्न राजसत्ता ॥ ९१ ॥ एक राजा मृत होतां । नष्ट न होय राजसत्ता । म्हणून तिची भिन्न कथा । उघड उघड दिसते कीं ॥ ९२ ॥ परी तादात्म्य राजसत्तेसी । जो होतो निश्चयेसीं । राजेपण तयासीं । लाधते हा न्याय असे ॥ ९३ ॥ स्वतः ती राजसत्ता । अविक्रिय आहे सर्वथा । मात्र तिचा आधार पोंहचतां । सर्व कांहीं घडतसे ॥ ९४ ॥ तूं जो बैसतोस गादीवर । तो राजसत्तेच्या जोरा-

वर । जो पंखा वारी तुजवर । तव शिपाई नारायणा ॥ ९५ ॥ तोही राजसत्तेनीं । पंखा वारी तुजवरी जाणी । तुम्हां उभयतां लागूनी । कारण सत्ता एकची ॥ ९६ ॥ पूर्ण राजसत्तेचा । अनुभव राजा घेत साचा । तिच्या कांहीं अंशाचा । अनुभव घेत अधिकारी ॥ ९७ ॥ त्याही पेक्षां कमी अंश । लाधलासे शिपायास । नुसत्या तिच्या आश्र-यास । राहून रयत वर्ततसे ॥ ९८ ॥ तैसे आत्मे पारमार्थिक । ब्रह्मासी तादात्म्य होती देख । म्हणून त्यांना ब्रह्मसुख । पूर्ण लाधे नारायणा ॥९९॥ ऐसें ऐकतां गुरूभाषण। तो गोविंदात्मज नारायण। बोलता झाला कर जोडून । त्या साई समर्थासी ॥१००॥ निरवयव राजसत्तेचे । अंश कैसे पडतील साचे । अंश पडतां तियचे । निरव-यत्व जाईल ॥ १०१ ॥ महाराज ह्मणती तेधवां । नाना प्रश्न केलास बरवा । तेणें समाधान माझे जिवा । झालें असे ये काळीं ॥ १०२ ॥ राजसत्ता अभेद खचित । परी विभागाची येते प्रचीत । तोच न्याय चैतन्यांत । अनंतरूप दिसे जें ॥ १०३ ॥ त्या सत्तेचे न अंश पडती । परी ग्राहक भाग पाडून घेती । जैसी ज्याची असे शक्ती । तो तितुके घेत असे ॥ १०४ ॥ घट बोळकें रांजण । डेरा गेळा माथणी जाण । या अवघ्यांत भरून । आकाश राहिलें नारायणा ॥ १०५ ॥ आकाश जेव्हढें नदींत । त्यापेक्षां थोडें किंचित । समावलें रांजणांत । त्यापेक्षां घटांत कमी॥१०६॥ गेळ्या बोळक्यापाजीं जाण । कमी असे त्याहून । आकाशाचे कां ह्मणून । भाग येथे पडले बा ॥१०७॥ तीच आहे तेथें स्थिती । हें नाना आण चित्तीं । हें आत्म्याचें रूप निश्चितीं । तुजलागीं निर्वेदिलें ॥ १०८ ॥ हें जें अवघें दिसतसे जगत । तो मायेचा खेळ सत्य । मायाब्रह्म एकचित्त । होऊन ब्रह्मांड रचियेलें ॥ १०९ ॥ तैं म्हणे तो नारायण । समर्था ही माया कोण । कधीं कोणी निर्माण । केलें ईस ती आहे कसी ॥ ११० ॥ जगाचें आद्य कारण । आपण कथिलें चैतन्य । जग त्याहून नसे भिन्न । मग ही माया आली कशी

॥१११॥ महाराज बोलले त्यावरी । माया उदेली कैशापरी । तें मी सांगतों निर्धारीं । ऐक आतां एकचित्तें ॥ ११२ ॥ त्या चैतन्याची जी शक्ति । तीच माया निश्चितीं । तिनें या चैतन्याप्रती । ठायीं ठायीं नटविलें ॥ ११३ परी निवड करूं जातां । वेगळी न होती सर्वथा । गूळ गोडी निवडितां । जैसी नाना नये कीं ॥ ११४ ॥ वा सूर्य आणि प्रभा त्याची । पृथक करितां नये साची । तीच ब्रह्म आणि मायेची । आहे स्थिती चांदोरकरा ॥ ११५ ॥ सूर्य आणि प्रभा जाण । शब्द जरी भिन्न दोन । परी प्रभा सूर्य मिळोन । सूर्य आला आकारा ॥११६॥ सूर्य आपल्या प्रभेकरून । आपुलेंच जगा करवितो ज्ञान । माया ब्रह्मांत तो जाण । प्रकार आहे नारायणा ॥ ११७॥ परी माया आहे सांत । चैतन्य तें अंतातीत । परी दोहोंचें अनादित्व कायम आहे सर्वथा ॥ ११८ ॥ माया ती प्रकृति । चैतन्य पुरुष निश्चितीं । या दोहोंपासून उत्पत्ती । झाली जगाची या वत्सा ॥ ११९ ॥ प्रकृति पुरुषाचें विवरण । गेला ज्ञानराजा करून । अमृतानुभवा माजीं जाण । मोहिनी राज प्रसादें ॥ १२० ॥ म्हणून आतां तयाची । पुनरुक्ति न मी करीं साची । फक्त त्या आत्मज्ञान गुहेची । ओळख देतों करून ॥ १२१ ॥ जे जे त्या गुहेंत । गेले ते न येती परत । ते गुहाच होउनियां तेथ । आनंदानें राहती ॥ १२२ ॥ पुरुष अवध्याचा कारण । माया हें कार्य जाण । त्या मायेचें महिमान । अगाध आहे नारायणा ॥ १२३ ॥ मी गोम्या तिम्या अमका कोणी । भास हें जें वाटतें नाना मनीं । तें मायेच्या योगानीं । असत्या होतसे ॥ १२४ ॥ मायेनें वेधिल्या पूर्ण । सत्यार्थें न राहे भान । माये माजीं दोन गुण । आहेत ते ऐके आतां ॥ १२५ ॥ जें आहे त्या झांकणें । जें नाहीं तें भासवणें । त्या मायेच्या योगानें । भ्रमित होतो जीव हा ॥ १२६ ॥ एक्या मजुरास पडलें स्वप्न । कीं मी राजा झालों म्हणून । येथें प्रथमतः

मजूरपण । त्याचें झांकिलें मायेनें ॥ २७ ॥ वास्तविक नसतां राजेपण । तें त्या मायेनें भासविलें जाण । तैसें ब्रह्मास झांकून । जगांत माया दावितसे ॥ १२८ ॥ वस्तुता हें नोहे जगत । एक चैतन्य वस्तु सत । परी मायेमुळें आलें प्रतीत । जगत आहे म्हणूनी ॥ १२९ ॥ जगतासह जगताचे । विषय अवघे असत्य साचे । परी ते सत्य वाटून जगताचे । अकल्याण करिताती ॥१३०॥ यासाठींच आवरण । टाका मायेचें ज्ञानें करून । मग दिसेल शुद्ध चैतन्य । तूंच अवघा म्हणोनी ॥ १३१ ॥ पाण्याचें गेल्या गढूळपण । जैसें दिसतें शुद्ध जीवन । तैसें मायेचें गढूळपण । टाकितां चैतन्य दिसेल कीं ॥ १३२ ॥ त्या सद्वस्तूची उपासना । तुवां करावी नारायणा । हेंच माझें अवघ्यांना । आहे आतां सांगणें ॥१३३॥ आत्मा तीच सद्वस्तु । हा अध्यात्माचा होय हेतु । तो आत्मा जाणून तूं । ह्याच जन्मीं मुक्त व्हावें ॥ ३४॥ ऐसें ऐकतां ब्रह्मज्ञान । अवघे आनंदले पूर्ण । समर्थपदीं लोटांगण । घालूं लागले शिष्य ते॥१३५॥ वैद्य साठे चांदोरकर । वेरे नाना निमोणकर । मारुती लक्ष्मण नूलकर । किती म्हणोन वर्णावे ॥ १३६ ॥ अनुलक्षूनी या अवघ्यांसीं । महाराज बोलले प्रेमेंसी । वत्सांनों या ज्ञानासीं । ठेवा मनीं जागृत ॥ १३७ ॥ तथास्तु म्हणती अवघे भक्त । वारंवार घालिती दंडवत । ज्ञाननभींचा सविता जेथ । तेथें अंधार कोठोनी ॥ १३९ ॥ हे साई महाराज कृपाराशी । पदरीं घ्या या लेंकरासी । आपुल्या कृपाछायेसी । बैसवा हा दासगणू ॥ १३९ ॥ स्वस्तिश्री संत कथामृत । साईमहाराज मेघ येथ । वर्षला हें ज्ञानामृत । त्यासी सेवा म्हणे गणू ॥१४०॥ इति सप्तपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः

## श्री दासगणूकृत श्री संत कथामृत

### यातील श्री साईबाबाविषयींचा ५७ वा अध्याय.

हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला असल्यामुळें त्याचें पुनर्मुद्रण व्हावें असें सुचविल्यामुळें या ग्रंथाचे अध्याय पहिल्यापासूनच श्री साईलीलेंत यापुढें छापून प्रसिद्ध होतील.

—संपादक.